cmyk

दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

बीड – महाराष्ट्र वर्ष – ४ अंक–२२४ शुक्रवार, दि.०६ डिसेंबर २०२४ RNI No.: MAHMAR/2021/85884 NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 पाने– ६ किंमत ३ रूपये

संपादकीय

धडाकेबाज कामाची अपेक्षा

महाराष्ट्राच्या विधानसभा निवडणुकीत अनेक अडचणी, अडथळे, रुसवे–फुगवे, चक्रव्यूह पार करत महायुतीला महायश मिळवून देणारे देवेंद्र गंगाधर फडणवीस यांची अपेक्षेप्रमाणे भाजप विधीमंडळ पक्षाचे नेते म्हणून निवड झाली आणि मुख्यमंत्री म्हणून शपथही घेतील. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांनीही उपमुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली. महाराष्ट्राचा लाडकाभाऊ देवेंद्र फडणवीस आहेत यावर आता शिक्कामोर्तब झाले आहे. सरकार स्थापनेनंतर नागपूरसह राज्यभर भाजप व महायुतीच्या कार्यकर्त्यांनी जल्लोष केला. 'मी पुन्हा येईन होय मी पुन्हा येईन' हा शब्द देवेंद्र फडणवीस यांनी पूर्ण करुन दाखवला.

शेतकऱ्यांची पुन्हा दिल्लीकडे कूच

सरकारने दिल्लीच्या सीमा बंद केल्या

नवी दिल्ली । वृतसंस्था

गेल्या दोन दिवसांपूर्वी भूसंपादन आणि नुकसान भरपाईवरून पंजाब आणि हरियाणातील १० शेतकरी संघटना नोएडा आणि गाझियाबाद रस्त्यावर उतरल्या होत्या. यामुळे नोएडा महामार्ग जाम झाला होता. पण प्रशासनाने शेतकरी संघटनांची समजूत काढल्याने शेतकरी दिल्लीच्या सीमेवरच थांबले होते. मात्र आता शुक्रवारी (दि.६) पुन्हा एकदा शेतकरी संघटनानी दिल्ली चलोचा नारा दिला आहे. यामुळे पोलीस प्रशासन अलर्ट झाले आहे. शेतकरी दिल्लीकडे येऊ नये, यासाठी नोएडा महामार्गावर पोलीस बंदोबस्त लावण्यात आला आहे. तर दिल्लीत देखील चोख पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. यामुळे येथे पोलीस छावणीचे स्वरूप आले आहे.

हमीभाव कायद्यासह विविध मुद्द्यांवर १३ फेब्रुवारीपासून पंजाब आणि हरियाणाच्या सीमेवर शेतकरी आंदोलन करत आहेत. आता भूसंपादन आणि नुकसान भरपाईसाठी

१० शेतकरी संघटना रस्त्यावर उतरल्या आहेत. भारतीय किसान परिषद, किसान मजदूर मोर्चा आणि संयुक्त किसान ◀◀ पान २ वर

येणाऱ्या पाच वर्षात फडणवीसांसमोर राजकीय संघर्ष

ज्योतिष शास्त्राचे भाकीत: कार्यकाळ पुर्ण करणार पण अंतर्गत कलाहांचा करावा लागणार सामना

मुंबई । प्रतिनिधी

देवेंद्र फडणवीस यांनी महाराष्ट्राचे २१ वे मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली असून त्यांच्या कुंडलीत नेमकं काय आहे? ते पाच वर्षाचा कार्यकाळ पुर्ण करणार का? विकासाची कामे ते करणार का? असे अनेक प्रश्न सर्वसामान्य नागरीकांना पडले असतील. या सर्वांचे उत्तर ज्योतिष शास्त्राने दिले आहेत.

फडणवीस यांचा जन्म २२ जुलाई १९७० साली झाला. त्यांच्या जन्म तारखेनुसार त्यांच्या कुंडलीमध्ये सध्या शनी आणि राहू ग्रहांची दशा सुरू आहे. ज्योतिष शास्त्रात याला विपरीत राजयोग असेही म्हणतात. त्यामुळे येणारा काळ हा देवेंद्र फडणवीस यांच्यासाठी राजकीय संघर्षाचा ◀◀ पान २ वर

महाराष्ट्रात 'देवेंद्र' पर्वाला सुरुवात

'मी देवेंद्र सरिता गंगाधरराव फडणवीस शपथ घेतो की...पंतप्रधान मोदी, अमित शहांसह २२ राज्यांच्या मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत पार पडळा शपथविधी सोहळा

मुंबई । प्रतिनिध

महाराष्ट्राचे राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी देवेंद्र फडणवीस यांना गुरुवारी मुख्यमंत्रीपदाची शपथ दिली. मी देवेंद्र सरिता गंगाधरराव फडणवीस शपथ घेतो की... म्हणत महाराष्ट्रात पुन्हा एकदा देवेंद्र पर्वाला सुरुवात झाली आहे. देवेंद्र फडणवीस यांचा शपथविधीचा सोहळा हा अतिशय भव्यदिव्य असा ठरला. खुद्द देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्यासह २२ राज्यांच्या मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत हा शपथविधी सोहळा पार पडला.

अखेर १३ दिवसांच्या मोठ्या प्रतिक्षेनंतर महाराष्ट्राला नवा मुख्यमंत्री मिळाला आहे. भाजपचे महाराष्ट्रातील नंबर वनचे नेते देवेंद्र फडणवीस यांनी महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली आहे. देवेंद्र फडणवीस ◀◀ पान २ वर

फडणवीसांसमोर हे असणार नवे आव्हान

या नव्या पर्वात देवेंद्र फडणवीस लाडकी बहीण योजना, जलयुक्त शिवार योजना अशा महत्त्वकांक्षी योजनांना नवे वळण देतात का? ते पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे. तसेच महाराष्ट्रातील तरुणांचा रोजगार हा अत्यंत महत्त्वाचा प्रश्न आहे. महाराष्ट्रातील तरुणांना रोजगार कसा मिळेल, राज्यातील विविध भागांमध्ये पाणीटंचाईचे संकट कसे दूर होईल, शेतकऱ्यांना हवा तितका हमीभाव देण्यापासून मराठा, ओबीसी आणि धनगर आरक्षणांच्या मुद्द्यांचे मोठे आव्हान देवेंद्र फडणवीस यांच्यासमोर असणार आहे.

एकनाथ शिंदे उपमुख्यमंत्री; बाळासाहेब ठाकरे, आनंद दिघेंचे स्मरण करीत घेतली शपथ

फडणवीस सरकारमध्ये एकनाथ शिंदे शपथ घेणार का? याविषयी मोठा संभ्रम होता. अखेर एकनाथ शिंदे यांनी उपमुख्यमंत्री पदाची शपथ घेतली. मात्र शपथ घेण्यापुर्वी त्यांनी बाळासाहेब ठाकरे आणि आनंद दिघे यांचे स्मरण केले आणि नंतर उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली.

सहाव्यांदा उपमुख्यमंत्री; अजित पवारांची आगळी वेगळी शपथ

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणून भाजप नेते देवेंद्र फडणवीस यांनी आज तिसऱ्यांदा शपथ घेतली. त्याचवेळी उपमुख्यमंत्री म्हणून एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांनी शपथ घेतली. अजित पवार यांनी उपमुख्यमंत्रीपदी शपथ घेण्याचा विक्रम केला. त्यांनी सहाव्यांदा उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेताना पिंक जॅकेट घातला होता. तसेच मी शपथ घेतो ऐवजी त्यांनी 'गांभीपूर्वक प्रतिज्ञा करतो की' या शब्दाचा वापर करत वेगळपणा सिद्ध केला.

फडणवीसांपासून दोन खुर्च्या सोडून शिंदे बसले

नरेंद्र मोदी यांचं व्यासपीठावर आगमन होत असताना, त्याच क्षणी देवेंद्र फडणवीस, एकनाथ शिंदे आणि अजित पवार हे तीनही नेते एकत्रपणे मंचावर दाखल झाले. यानंतर ते आपल्या जागेवर स्थानापन्न झाले. यावेळी देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार हे आजूबाजूला बसले. पण एकनाथ शिंदे हे दोन खुर्च्या सोडून बाजूला बसले. त्यामुळे एकनाथ शिंदे हे उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेणार की नाही? अशी शंका निर्माण झाली होती, मात्र त्यांनी शपथ घेतली.

तीन वेळा मुख्यमंत्री होणारे शरद पवारांनंतर फडणवीसच!

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणून देवेंद्र फडणवीस ५ डिसेंबर रोजी शपथ घेत आहेत. यावेळी देवेंद्र फडणवीस यांच्या नावावर आता अनेक विक्रम होत आहे. तसेच काही मिथक त्यांच्यामुळे तोडले जात आहे. देवेंद्र फडणवीस तीन वेळा मुख्यमंत्री होत आहे. महाराष्ट्रात तीन वेळा मुख्यमंत्री आतापर्यंत केवळ शरद पवार झाले होते. शरद पवार १९७८,१९९०, १९९३ असे तीन वेळा मुख्यमंत्री झाले. परंतु शरद पवार यांना एकदाही पाच वर्षांचा कार्यकाळ पूर्ण करता आला नाही. शरद पवार याच्या देवेंद्र फडणवीस तीन वेळा मुख्यमंत्री झाले आहेत.

मंत्रालयात पाट्या बदलल्या

तीनही नेत्यांच्या शपथविधीनंतर मंत्रालयाच्या गेटवर स्वागतासाठी सजावट करण्यात आली होती. तीनही नेते मंत्रालयाच्या गेटवर आले तेव्हा लाडक्या बहिणींनी तीनही नेत्यांचे औक्षण केले. दरम्यान, शपथविधी सोहळ्यानंतर मंत्रालयाच्या सहाव्या मजल्यावर हालचाली वाढल्या. सहाव्या मजल्यावर मुख्यमंत्र्यांचे दालन आहे. तिथे एकनाथ शिंदे यांची मुख्यमंत्री म्हणूनची पाटी बदलून देवेंद्र फडणवीस यांच्या नावाची पाटी लावण्यात आली. तर देवेंद्र फडणवीस यांची पाटी असलेल्या उपमुख्यमंत्रीपदाच्या दालनाबाहेर एकनाथ शिंदे यांची पाटी लावण्यात आली. अजित पवार यांच्या दालनाबाहेरील पाटीमध्ये बदल करण्यात आला नाही. कारण याआधीदेखील ते उपमुख्यमंत्री होते.

फडणवीस थेट मंत्रालयात; पदभार स्विकारला

मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतल्यावर देवेंद्र फडणवीस यांनी थेट मंत्रालय गाठून मुख्यमंत्री पदाचा पदभार त्यांनी यावेळी स्विकारला. तसेच दोन्ही उपमुख्यमंत्र्यासोबत कॅबिनेट बैठक घेतली. तसेच यावेळी त्यांनी उपस्थितांशी चर्चा करुन आपण आता थांबणार नाही तर काम करणार असल्याचा संदेश त्यांनी यातून दिला आहे.

फडणवीसांकडून विशेष अधिवेशनाची घोषणा

सरकार स्थापनेनंतर आता दि. ७ डिसेंबरला विधिमंडळाचे विशेष अधिवेशन बोलवण्यात आले आहे. विधिमंडळ सचिवालयाकडून कर्मचाऱ्यांना याबाबत महत्त्वाच्या सूचना देण्यात आल्या आहेत. या विशेष अधिवेशनात नवनिर्वाचित आमदारांचा शपथविधीचा कार्यक्रम पार पडणार आहे. हा कार्यक्रम जवळपास दोन दिवस चालण्याची शक्यता आहे. त्यामुळे हे विशेष अधिवेशन दोन दिवस असण्याची शक्यता आहे. या विशेष अधिवेशनानंतर दोन आठवड्यांनी नागपुरात हिवाळी अधिवेशन होणार आहे.

मंत्रिमंडळ विस्ताराकडे लक्ष

गुरुवारी मुख्यमंत्री म्हणून देवेंद्र फडणवीस त्यानंतर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांनी शपथ घेतली. गुरुवारी या तिघांशिवाय कोणीची शपथ घेतली नाही. आता मंत्रिमंडळाचा विस्तार ११ डिसेंबर रोजी होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. या मंत्रिमंडळ विस्तारात कोणा कोणाला स्थान मिळते? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

नेत्यांपेक्षा सेलिब्रिटींचीच जास्त गर्दी

रिलायन्स उद्योग समूहाचे सर्वेसर्वा मुकेश अंबानी, अभिनेता सलमान खान, सचिन तेंडूलकर, अमृती फडणवीस, रणबीर कपूर, रणवीर सिंग, शाहरुख खान, विद्या बालन, माधुरी दिक्षीत, जॉकी श्रॉफ यांच्यासह बरेच बॉलिवुड स्टार या सोहळ्यासाठी हजर होते. नेत्यांपेक्षा सेलिब्रिटींचीच मोठी गर्दी असल्याचे दिसत होते.

राज ठाकरेंकडून शुभेच्छा अन् इशाराही..!

राज्यात महायुतीचे सरकार स्थापन होताच मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी एक्सवर पोस्ट शेअर करत प्रतिक्रिया दिली आहे. यावेळी त्यांनी देवेंद्र फडणवीसांचे मुख्यत्वे अभिनंदन केले आहे. २०१९ ला खरंतर ही संधी त्यांना मिळायला हवी होती, पण तेंव्हा आणि पुढे २०२२ मध्ये जे घडले त्यामुळे ती संधी हुकली असे राज ठाकरे म्हणाले आहेत. तसेच पण सरकार चुकत आहे, लोकांना गृहीत धरत आहे असे जर जाणवले, तर विधिमंडळाच्या बाहेर आम्ही सरकारला त्यांच्या चुकांची जाणीव करून देऊ हे नक्की असा इशाराही राज ठाकरेंनी दिला आहे.

फडणवीस यांच्या नावावर असेही विक्रम

वसंतराव नाईकनंतर सलग पाच वर्ष पूर्ण करणारे देवेंद्र फडणवीस दुसरे मुख्यमंत्री ठरणार आहे. ३१ ऑक्टोबर २०१४ ते १२ नोव्हेंबर २०१९ असा फडणवीस यांचा पाच वर्षांचा मुख्यमंत्रीपदाचा कालावधी होता.

२०१४, २०१९, २०२४ या तीन विधानसभा निवडणुकीत देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री झाले. त्यावेळी त्यांच्या पक्षाला शंभरापेक्षा जास्त जागा होत्या. परंतु २०१९ मधील शपथविधी काही तासांचा ठरला होता.

महाराष्ट्रात ४६ वर्षांत नऊ उपमुख्यमंत्री झाले. परंतु त्यापैकी कोणालाही पुन्हा मुख्यमंत्री होता आले नाही. राज्यात उपमुख्यमंत्री राहिलेला व्यक्तीला मुख्यमंत्री होता येत नाही, असे मिथक तयार झाले होते. मात्र आता देवेंद्र फडणवीस यांनी हा पॅटर्न बदलला. ते उपमुख्यमंत्रीनंतर मुख्यमंत्री झालेले राज्यातील पहिले व्यक्ती ठरले आहेत.

३१ ऑक्टोबर २०१४ रोजी वयाच्या ४४ व्या वर्षी मुख्यमंत्रिपदाची शपथ घेणारे फडणवीस हे महाराष्ट्राचे दुसरे सर्वात तरुण मुख्यमंत्री होते. त्यापूर्वी वयाच्या ३८ व्या वर्षी मुख्यमंत्रीपदाची शपथ घेणारे शरद पवार महाराष्ट्राचे सर्वात तरुण मुख्यमंत्री होते.

सर्वात कमी काळासाठी महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री म्हणून नोंद त्यांच्या नावावर आहे. २०१९ मध्ये ते केवळ चार दिवसांसाठी मुख्यमंत्री ठरले होते. २३ नोव्हेंबर २०१९ ते २६ नोव्हेंबर २०१९ असा तो काळ होता.

बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड,दि.०५ डिसेंबर २०२४

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

गहू: ४.०० क्विंटल			
	किमान	कमाल	सरासरी
	२,७१८	२,७२०	२,७१९
ज्वारी/हायब्रिड: २०.५० क्विंटल			
	२,१५१	२,९३०	२,४६३
मका/लोकल: ७.०० क्विंटल			
	२,१५०	२,१५०	२,१५०
तूर : २२.०० क्विंटल			
	६,२०१	६,८५०	७,५००
उडीद : ०.५० क्विंटल			
	६,०००	६,०००	६,०००
बाजरी: १४.०० क्विंटल			
	२,२००	३,१०१	२,४९७
मुग : २.५० क्विंटल			
	७,३०१	७,३०१	७,३०१
सोयाबीन: ३४५.५० क्विंटल			
	३,५००	४,२८०	४,०९३
हरभरा: २.०० क्विंटल			
	४,४०१	६,८०१	५,४०१

धनंजय मुंडेंचे सिरसाळा एमआयडीसी पूर्णत्वाच्या दिशेने महत्वाचे पाऊल

मुंडेंनी प्रस्तावित केलेल्या औद्योगिक क्षेत्र विकास आराखड्यास एमआयडीसीने दिली मंजुरी

मुंबई । प्रतिनिधी

परळीचे आमदार धनंजय मुंडे यांनी परळी तालुक्यातील शिरसाळा येथे औद्योगिक विभागाने अधिग्रहीत केलेल्या जागी पंचतारांकित एमआयडीसी पूर्ण करण्याचा ध्यास घेतलेला असून एमआयडीसीमध्ये प्रत्यक्ष उद्योगांना सुरुवात करण्याच्या दृष्टीने एमआयडीसी पूर्णत्वाच्या साठी अत्यंत महत्त्वपूर्ण पाऊल उचलण्यात आले आहे.

धनंजय मुंडे यांच्या विनंतीनुसार प्रस्तावित केल्याप्रमाणे शिरसाळा येथे अधिग्रहित करण्यात आलेल्या शासकीय जमिनीवर औद्योगिक क्षेत्रात पूरक बाबी विकसित करण्यास औद्योगिक विकास महामंडळाने मंजुरी दिली असून, यामध्ये प्रामुख्याने २० मीटर मुख्य रस्ता, १२ मीटर अंतर्गत रस्ते, १५ मीटर सर्व्हिस रस्ते यांसह लघु व मध्यम उद्योगांसाठी राखीव जागा (प्लॉट) निर्मितीसाठी त्याचबरोबर सहाय्यभूत सुविधा निर्माण करण्याच्या प्रस्तावास औद्योगिक विकास महामंडळाने मंजुरी दिली आहे. सिरसाळा येथे अधिग्रहित करण्यात आलेल्या जमिनीवर एकूण १६ हेक्टर क्षेत्र हे संबंधित सुविधांसाठी मंजुर करण्यात आले असून, यासाठी धनंजय मुंडे यांनी ◀◀ पान २ वर

cmyk

अग्रलेख

धडाकेबाज कामाची अपेक्षा

महाराष्ट्राच्या विधानसभा निवडणुकीत अनेक अडचणी, अडथळे, रुसवे-फुगवे, चक्रव्युह पार करत महायुतीला महायश मिळवून देणारे देवेंद्र गंगाधर फडणवीस यांची अपेक्षेप्रमाणे भाजप विधीमंडळ पक्षाचे नेते म्हणून निवड झाली आणि मुख्यमंत्री म्हणून शपथही घेतील. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांनीही उपमुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली. महाराष्ट्राचा लाडकाभाऊ देवेंद्र फडणवीस आहेत यावर आता शिक्कामोर्तब झाले आहे. सरकार स्थापनेनंतर नागपूरसह राज्यभर भाजप व महायुतीच्या कार्यकर्त्यांनी जल्लोष केला. 'मी पुन्हा येईन होय मी पुन्हा येईन' हा शब्द देवेंद्र फडणवीस यांनी पूर्ण करुन दाखवला.

लाडक्या बहिणींनी फडणवीस आणि महायुतीला समर्थन दिले आणि या सर्व राजकीय चिखलात कमळ उमलले. खरे तर इतके जबरदस्त यश मिळाल्यावर तातडीने हाच निर्णय अपेक्षित होता. पण एकनाथ शिंदे अडून बसले होते. बाहेरुन पाठिंबा, उपमुख्यमंत्रीपद नको, वगैरे आढेवेढे घेत ते गृहमंत्री व उपमुख्यमंत्री पदावर अडकले होते. अजितदादांना व त्यांच्या कार्यकर्त्यांना मुख्यमंत्रीपदी अजितदादा पवार यांना संधी मिळाली असे वाटत होते पण ते शक्य नाही हे लक्षात येताच अजित पवारांनी दहा मंत्रीपदे, केंद्रात प्रफुल्ल पटेल यांना मंत्रिपद आणि एकाची राज्यपालपदी नियुक्ती व शिंदेंच्या बरोबरीने मंत्रीपदे मागितली होती. अजितदादांनी दिल्लीत तळ ठोकला होता. एकनाथ शिंदे गृह, गृहनिर्माण, नगरविकास यासह उपमुख्यमंत्रीपद मागत होते. शेवटी चर्चा, संकटमोचक महाजन यांच्या फेऱ्या होऊन तडजोड झाली आणि सरकारची स्थापना झाली. भाजप महायुतीत तीन पक्ष असल्याने असे थोडे फार होणार हे अपेक्षित असले तरी नागपूरात संघाचे पदाधिकारी विलंबासाठी चिडलेले दिसले व संघाने डोळे वटारताच झटपट निर्णय झाले. शपथविधी पाठोपाठ आता मंत्रीमंडळ विस्तार आणि विधीमंडळाचे नागपूर येथे होणारे हिवाळी अधिवेशन, मंत्रीमंडळाचे खातेवाटप अशी पावले महायुतीच्या नेत्यांना उचलावी लागणार आहेत. एकनाथ शिंदे व फडणवीस आणि अजितदादा पवार यांच्यातील मंत्रीमंडळ व खातेवाटप हा विषय चर्चेने मिटला असे सांगण्यात येत आहे. फडणवीस यांच्या मंत्रिमंडळात भ्रष्टाचार, गैरव्यवहार आरोप असणारा कोणी मंत्री नसेल अशीही भूमिका जाहीर झाली आहे. फडणवीस यांना मुख्यमंत्रीपद पाच वर्षे लाभणार की काही काळ हे स्पष्ट झालेले नाही. गृहखाते फडणवीस स्वत: सांभाळणार असे दिसत आहे. महाराष्ट्राला जनादेशाप्रमाणे भक्कम आणि स्थिर सरकार मिळाले आहे. देवेंद्र फडणवीस महाराष्ट्राचे लाडके भाऊ ठरले आहेत. भाजपने व मित्रपक्षांनी त्यावर शिक्कामोर्तब केले आहे. भव्य शपथविधी सोहळा पार पडला असून, सरकारकडून आता चांगले काम करण्याची अपेक्षा आहे. लगेचच मुंबई महापालिकेसह स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका आहेत. विरोधी पक्षाची विशेष करुन शिवसेना ठाकरे गट आणि शरद पवार राष्ट्रवादी गट पूर्णपणे जायबंदी झाला आहे. राज्याला विरोधी नेता होणार नाही असा सडकून पाडणारा जनादेश धडकी भरवणारा आहे तो पचवणे सोपे नाही. तुर्तास फडणवीस यांच्याकडे सर्वांच्या नजरा लागल्या आहेत.

मोठा जनादेश आणि सर्वांच्या मोठ्या अपेक्षा, महायुतीचे ऐक्य आणि धडाकेबाज काम यासर्व पातळीवर त्यांना काम करावे लागणार आहे. सन २०१९ मध्ये भाजप सेनेला स्पष्ट जनादेश मिळाला होता पण शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी जनादेश बाजूला सारत शरद पवार आणि राहुल गांधी यांना सोबत घेऊन मुख्यमंत्रीपद पटकावले. गेली पाच वर्षे महाराष्ट्राच्या राजकारणाचा चिखल झाला होता. रोज चिखलफेक सुरु होती. जातीधर्मात वाद लावले जात होते. आता या बहुमताच्या आणि जनतेने भरभरून दिलेल्या मतांची राखण हे सरकार कशी करते ते पहायचे आहे.

पत्रकार संरक्षण कायद्याचे लवकरच नोटीफिकेशन काढणार -फडणवीस

मुंबई । प्रतिनिधी

फडणीस पहिल्यांदा मुख्यमंत्री असताना महाराष्ट्रात २०१७ मध्ये पत्रकार संरक्षण कायदा झाला.. मात्र त्याचे नोटिफिकेशन निघाले नाही.त्यामुळे कायदा झाला असला तरी त्याची अंमलबजावणी झालेली नाही.

बुधवारी देवेंद्र फडणवीस यांच्या पहिल्याच पत्रकार परिषदेत मराठी पत्रकार परिषदेचे मुंबई विभागीय सचिव दीपक कैतके यांनी देवेंद्र फडणवीस यांना या संदर्भात प्रश्न विचारला असता त्यांनी ''लवकरच नोटिफिकेशन काढून कायदयाची अंमलबजावणी करण्यात येईल'' असे आश्वासन दिले. एस.एम देशमुख यांच्या नेतृत्वाखाली मराठी पत्रकार परिषदेने सतत बारा वर्षे लढा दिल्यानंतर राज्यात २०१७ मध्ये पत्रकार संरक्षण कायदा झाला होता.. त्यावर राष्ट्रपतींची स्वाक्षरी झाली आणि कायदा गॅझेट मध्ये आला.. मात्र त्याचे राज्य सरकारने नोटिफिकेशन न काढल्याने कायदा अंमलात आलेला नाही.त्यामुळे पुन्हा एकदा पत्रकारांवरील हल्ले वाढले आहेत. ही बाब दीपक कैतके यांनी आज मुख्यमंत्र्यांच्या निदर्शनास आणून दिली. पत्रकार पेन्शन वाढीच्या संदर्भातही लवकरच निर्णय घेण्यात येईल असे आश्वासन मुख्यमंत्र्यांनी दिले.. दरम्यान देवेंद्र फडणवीस यांची मुख्यमंत्रीपदी निवड झाल्याबद्दल एस.एम.देशमुख यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे. देवेंद्र फडणवीस यांच्या काळात पत्रकारांचे सर्व प्रश्न मार्गी लागतील अशी अपेक्षा एस.एम.देशमुख यांनी व्यक्त केली आहे.

प्रखर राष्ट्रभक्त, राष्ट्रनिर्माते : डॉ.बाबासाहेब आंबेडकर

भारतीय घटनेचे शिल्पकार ,घटणातज्ज्ञ, कृषितज्ज्ञ, अर्थतज्ज्ञ, डॉ बाबासाहेब आंबेडकर म्हणजे या देशाला लाभलेला दुसरा सूर्य होता असे म्हणणे वावगे ठरणार नाही. त्यांचे कार्य केवळ दलितांचे उद्धारक म्हणून जाणीवपूर्वक करण्याचे काम येथील समाजव्यवस्थेने आजपर्यंत केले आहे. या परिघाबाहेर त्यांना कसलीही ओळख मिळू नये म्हणून सर्वोतोपरी प्रयत्न केला गेला परंतु कोंबडी झाकल्याने सूर्य उगवायचा राहत नाही या उक्तीप्रमाणे डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे कार्य हळूहळू सर्वांना आता समजत आहे.थोर अर्थशास्त्रज्ञ, स्त्री उद्धारक, महान कायदे पंडित, भारतीय कृषी व्यवस्थेचे जाणकार, प्रखर राष्ट्रवादी, हैद्राबाद मुक्ती लढ्यातले अग्रणी,स्वातंत्र्य, समता बंधुता या मानवी मूल्यांचे खंदे पुरस्कर्ते, सामाजिक न्यायाची संकल्पना मांडणारे समाजशास्त्रज्ञ, नदीजोड प्रकल्पाचे प्रवर्तक, कुटुंब नियोजनाचे समर्थक, भारतीय संविधानाचे निर्माते, मनुस्मृती दहन करणारे क्रांतिकारी, बुद्ध धम्माचे अभ्यासक, भारतातील लोकशाहीचे निर्माते, संतती नियमनासाठी र. धो. कर्वेंचा खटला लढणारे बॅरिस्टर, जगभरातल्या उपेक्षित-शोषित- वंचित-पिडीत जनसमुहाचे प्रेरणास्त्रोत, छत्रपती शिवाजी महाराज,बुद्ध-कबीर- फुले यांना आदर्श मानून त्यांच्या विचारांचा विस्तार मांडणारे तत्त्वज्ञानी, भारतीय समाजाची मानसिकता ओळखणारा मनोवैज्ञानिक

इत्यादी भूमिकांतून अलौकिक-अजोड-अतुलनीय कामगिरी करणाऱ्या डॉ बाबासाहेबांचा आपण केवळ दलितांचे कैवारी आणि घटनेचे शिल्पकार म्हणूनच गौरव करतो. काही राजकीय पक्षांनी तर बाबासाहेबांच्या विचारांचा, तत्त्वांचा आपल्या सोयीनुसार वापर करून घेतलेला दिसतो.

अमेरिकेत न्यूयॉर्क इथे बाबासाहेबांच्या पुतळ्याखाली सिम्बॉल ऑफ नॉलेज अर्थात 'ज्ञानाचे प्रतीक' लिहिले आहे. अलीकडेच जपान सरकारने 'याहोहामा' शहरात बाबासाहेबांचा पुतळा बनवला आहे. हे सर्व प्रयत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे कार्य अधोरेखित करणारे आहे परंतु दुर्दैवाने ज्या देशात डॉ बाबासाहेब आंबेडकर जन्मले त्याच देशात त्यांना योग्य तो मानसन्मान मिळाला नाही ही शोकांतिका आहे. भारतातला मुख्य प्रवाहातला मीडिया याची दखल घेताना दिसत नाही. नोबेल पुरस्कार विजेते डॉ. अमर्त्य सेन बाबासाहेबांना अर्थशास्त्रातले आपले पिता मानतात. डॉ बाबासाहेबांच्या अर्थशास्त्रीय मांडणीच्या आधारे आलम दुनियेतला सर्वोच्च अर्थात नोबेल पुरस्कार मिळवता येतो पण तरीही त्यांना आपण अर्थशास्त्रज्ञ म्हणून स्वीकारायला राजी होत नाही, याला काय म्हणावे? प्रॉब्लेम ऑफ रुपी या पुस्तकात त्यांची अर्थतज्ञ म्हणून वेगळी ओळख दिसते.

त्यांनी बुद्ध-कबीर- फुले यांना बाबासाहेबांनी गुरू मानले. हे तिन्ही महात्मे दलित नव्हते परंतु मानवी मूल्यांची शिकवण आणि रुजवन करणारे ह्या महातम्यांना त्यांनी आपल्या जीवनाचे आदर्श मानत त्यांना आपले गुरू मानले. त्यांच्या विचारसरणीत 'शिका, संघर्ष करा आणि संघटीत रहा' या मंत्राचे बीज सापडते. डॉ बाबासाहेबांचे विचार केवळ दलित-बहुजनांसाठी उपयोगी नसून, जागतिकीकरणाच्या या कालखंडात सर्वांसाठी लाभदायक आहेत. कोसी नदी बिहारकरिता, तर दामोदर नदी बंगालसाठी दु:खाचे कारण होते. दरवर्षी या नद्यांना भयंकर पूर यायचा. या पुरात अनेकांचे जीव जायचे. मोठे नुकसान व्हायचे. बाबासाहेब १९४२ ते १९४६ या कालावधीत व्हाइसरॉय परिषदेचे सदस्य होते. या कालावधीत ते बिहार आणि बंगाल मध्ये गेले. तेथली आपत्ती पाहून साहजिकच त्यांचे मन द्रवले. त्यांनी खूपच कठीण परिस्थितीचा सामना करून या नद्यांवर धरणे बांधली. त्यामुळे अनेकांचे जीव वाचले, नुकसान टळले. या धरणांमुळे जलसिंचन आणि वीज निर्मिती होत असल्याने अनेक समस्या सुटल्या आहेत. नद्याजोड प्रकल्प हे डॉ बाबासाहेब आंबेडकरांची अभिनव संकल्पना होती. बाबासाहेब स्वतंत्र भारताचे कायदेमंत्री होते हे सर्वांना ज्ञात आहे. त्यांनी देशातल्या तमाम स्त्री वर्गाचे उत्थान करणारे हिंदू कोड बिल मांडले. इतर मागासवर्गीय समाजासाठी आयोगाची मागणी केली. त्यांच्या या दोन्ही मागण्या पूर्ण झाल्या नाहीत. या कारणांसाठी त्यांनी आपल्या मंत्रीपदाचा राजीनामा दिला.

देश म्हणजे केवळ जमिनीचा तुकडा नव्हे तर या मातीत जन्माला येणाऱ्या प्रत्येक नागरिकांना देण्यात आलेला हक्क, अधिकार आणि कर्तव्ये यांच्या संयोगातून राष्ट्र निर्माण होत असते,राष्ट्र उभारणी होत असते. त्यासाठी स्वातंत्र-समता-बंधुता आणि समन्यायाची गरज असते. भारतातल्या स्त्रियांवर तर डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी अनंत उपकार केले आहेत ज्याची जाणीव दुर्दैवाने इथल्या महिलांना आजही नाही. गुलामापेक्षाही वाईट जीवन जगणाऱ्या स्त्रियांना डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी मुक्त केले.डॉ बाबासाहेबांच्या स्त्रीहक्कांच्या लढ्यामुळेच आज भारतीय स्त्रिया अनेक मोठ्या पदांवर विराजमान झाल्या आहेत. महिलांना मिळणाऱ्या अनेक सवलती जसे नोकरी करणाऱ्या स्त्रियांना प्रसूतीची पगारी रजा ,वडिलांच्या प्रॉपर्टी मध्ये हिस्सा, शिक्षणाचा हक्क, डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी स्त्रियांना कायद्याने दिला हे बहुतांशी महिलांना ठावूक नाहिये. इंदिरा गांधी देशाच्या पहिल्या महिला प्रधानमंत्री बनल्या,राष्ट्रपती महिला बनल्या ही किमया डॉ बाबासाहेबांच्या संविधानाची आहे. पाश्चात देशात सुद्धा मतदानाचा हक्क मिळवण्यासाठी स्त्रियांना लढा द्यावा लागला. डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी लिहलेल्या संविधानाने मात्र, हा हक्क पुरुषांप्रमाणेच स्त्रियांनाही बहाल केला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे केवळ दलितांचे उद्धारक नव्हते, तर खऱ्या अर्थाने राष्ट्रनिर्माते होते. त्यांना कोटी कोटी अभिवादन

डॉ.राजेश मधुकरराव इंगोले
(सुप्रसिद्ध मानसोपचार व व्यसनमुक्ती तज्ञ)
मो.९४२२२४०७१०

शपथविधीदरम्यान महाराष्ट्रासाठी खूशखबर!

जागतिक बँकेकडून राज्याला नविन कर्ज मंजूर; विकास कामांना मिळणार गती

मुंबई । प्रतिनिधी

राज्यात नव्या सरकारचा शपथविधी होत असतानाच राज्यासाठी एक मोठी बातमी समोर आली आहे. जागतिक बँकेकडून महाराष्ट्रासाठी कर्ज मंजूर झाले आहे. जागतिक बँकेने प्रसिद्धीपत्रक काढत ही माहिती दिली आहे. कमी विकसित जिल्ह्यांमध्ये आर्थिक विकासाला चालना देता यावी यासाठी जागतिक बँकेने हे कर्ज दिले आहे. यामुळे जिल्ह्यांचा विकास होण्यास मदत होईल.

जागतिक बँकेने त्यांच्या निवेदनात म्हटले आहे की, विकास कामांना गती देण्यासाठी आणि संस्थात्मक क्षमता बळकट करण्यासाठी १८८.२ दशलक्ष मंजूर केले आहेत. जिल्हा नियोजन आणि विकास धोरणांना यामुळे मदत होईल. या मोहिमेअंतर्गत गुंतवणुकीमुळे जिल्ह्यांना आवश्यक डेटा, निधी आणि कौशल्ये उपलब्ध होतील. ज्यामुळे विकास आणि रोजगार निर्मितीला चालना मिळेल.

जिल्ह्यांतील व्यवसायांना चालना, पर्यटन क्षेत्रातील ई-सरकारी सेवांमध्ये सुधारणा, खाजगी क्षेत्राचा सहभाग यासाठी हा निधी मंजूर करण्यात आला आहे. भारतातील जागतिक बँकेचे कंट्री डायरेक्टर ऑगस्टे तानो कौमे म्हणाले की, संस्थात्मक क्षमता आणि जिल्हा स्तरावर समन्वयामध्ये स्पष्ट गुंतवणूक प्रदान करून, नियोजन आणि धोरण तयार करणे, खाजगी क्षेत्रासह सार्वजनिक क्षेत्रातील कार्यक्षम इंटरफेस, आणि सार्वजनिक लोकांसाठी उत्तम सेवा वितरण वाढवेल. विशेषत: मागास जिल्ह्यांच्या विकासाला याचा फायदा होईल.

किती कोटींचे कर्ज?

इंटरनॅशनल बँक फॉर रिकन्स्ट्रक्शन अँड डेव्हलपमेंटकडून १८८.२ दशलक्ष कर्ज देण्यात आले आहे. ज्याचा कालावधी १५ वर्षांचा आहे. ज्यात पाच वर्षांच्या वाढीव कालावधीचा समावेश आहे. असे मीडिया रिलीजमध्ये म्हटले आहे.

पान १ वरून...

येणाऱ्या पाच वर्षात

असू शकतो. या काळात फडणवीसांना अंतर्गत राजकीय कलाहांचा सामना करावा लागू शकतो. कारण त्यांच्या कुंडलीमध्ये सध्या पाचव्या भावात शनी आहे. त्यामुळे संघर्ष करावा लागण्याची शक्यता आहे. मात्र जरी असं असलं तरी देवेंद्र फडणवीस हे आपला पाच वर्षांचा मुख्यमंत्रिपदाचा कार्यकाळ पूर्ण करतील असे भाकीत वर्तवण्यात आले आहे. दरम्यान फडणवीस यांच्या कुंडलीनुसार पुढील पाच वर्षांमध्ये सरकार हे शेतकरी आणि सर्वसामान्यांसाठी काही मोठे निर्णय घेण्याची शक्यता आहे. शेतकऱ्यांना कर्जमाफी मिळण्याची शक्यता आहे. तसेच लाडकी बहीण या सारख्या योजना सुरूच राहणार आहेत मात्र याच्या श्रेयवादावरून संघर्ष निर्माण होण्याचा अंदाज वर्तवण्यात आला आहे.

शेतकऱ्यांची पुन्हा

मोर्चासह इतर संघटनांच्या नेतृत्वाखाली शेतकऱ्यांनी दिल्ली चलोचा नारा दिला. शेतकऱ्यांनी नव्या कायद्यानुसार नुकसान भरपाई मिळावी, या प्रमुख मागणीसाठी मोर्चा काढला होता. ज्यामुळे चिल्ला सीमेवर महाजाम झाला होता. दोन दिवस शेतकरी चिल्ला सीमेवर थांबून होते. पण आता जगजीत सिंह डल्लेवाल आणि सरवन सिंह पंढेर यांनी, शेतकरी दिल्लीकडे कूच करतील, अशी माहिती दिली आहे. मात्र यात किसान मजदूर मोर्चा आणि किसान सभेचा सहभाग असणार नाही. शेतकरी संघटनांच्या घोषणेनंतर आता पुन्हा एकदा महामार्ग जाम होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. हरियाणा आणि दिल्लीच्या सीमेवर पोलीस प्रशासनाने ४ हजार हून अधिक सुरक्षा कर्मचारी तैनात केले आहेत. यामुळे दिल्लीसह नोएडा महामार्गाला छावणीचे स्वरूप आले आहे. दरम्यान, शेतकरी दिल्लीकडे निघाले असल्याने बॅरिकेड्स लावण्यात आल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे. दरम्यान, पंजाब पोलिसांनी शंभू सीमेवर शेतकरी नेत्यांची बैठक घेतली. पोलीस उपमहानिरीक्षक मनदीप सिंग सिद्धू (पटियाळा रेंज) आणि वरिष्ठ पोलीस अधीक्षक नानक सिंग यांनी शेतकरी नेते सर्वन सिंग पंढेर आणि सुरजीत सिंग फूल यांची भेट घेतली. यावेळी मोर्चाबाबत चर्चा करण्यात आली.

टिकैत यांना घेतले ताब्यात

भूसंपादन आणि नुकसान भरपाईसाठी आंदोलन करणाऱ्या शेतकऱ्यांना आडवल्याने बीकेयू नेते राकेश टिकैत यांनी केंद्रासह राज्य सरकारवर जोरदार टीका केली. तसेच त्यांनी आंदोलनात भाग घेतला. मात्र त्यांना आग्रा नोएडा यमुना एक्सप्रेसवेवरील टप्पल येथे यूपी पोलिसांनी अटक केली. यावरून एकच खळबळ उडाली होती. तर शेतकऱ्यांनी याबाबत निषेध व्यक्त करताना पोलीस आम्हाला दिल्लीत पोहचू देत नाहीत. अनेक शेतकऱ्यांना त्यांच्या जिल्ह्यातच थांबवण्यात आल्याचा आरोप देखील शेतकऱ्यांनी केला.

समस्या शांततेने सोडवू : केंद्रीय कृषी राज्यमंत्री

शेतकऱ्यांच्या प्रश्नावरून संसदेच्या हिवाळी अधिवेशनात काँग्रेसने केंद्र सरकारवर जोरदार हल्लाबोल केला. तसेच याच प्रश्नावरून वॉकआऊट केला. तर राज्यसभा सभापती धनखड यांनी केंद्र सरकारला घरचा आहेर दिला होता. आपण सरकार म्हणून शेतकऱ्यांना दिलेली आश्वासने का पाळत नाही? असा सवाल केला होता. यावेळी केंद्रीय कृषिमंत्री शिवराज सिंह चौहान देखील उपस्थित होते. केंद्रीय कृषी राज्यमंत्री भगीरथ चौधरी यांनी सांगितले की, शेतकरी समाज हा निष्पाप समुदाय आहे. कोणताही मुद्दा असेल, समस्या असेल तर ती शांततापूर्ण चर्चेतून सोडवता येते, असे ते म्हणाले.

महाराष्ट्रात 'देवेंद्र'

हे राज्याचे २१ वे मुख्यमंत्री बनले आहेत. महाराष्ट्राची राजधानी असलेल्या मुंबईत आझाद मैदानावर अतिशय भव्यदिव्य स्वरुपात देवेंद्र फडणवीस यांच्या शपथविधीचा कार्यक्रम आज पार पडला. महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत महायुतीला घवघवीत यश मिळाले. महायुतीला २८८ पैकी तब्बल २३० जागांवर यश मिळाले. महायुतीला मिळालेले हे यश अभूतपूर्व असे यश आहे. आतापर्यंतच्या इतिहासात महाराष्ट्रात कोणत्याच युतीला आणि आघाडीला इतके यश मिळालेले नव्हते. या यशात भाजपचा मोठा वाटा आहे. भाजपने १३२ जागांवर विजय मिळवला. त्यामुळे भाजपचाच मुख्यमंत्री बनेल हे जवळपास निश्चित होते. पण तरीदेखील महायुतीत अंतर्गत सुरु असलेल्या घडामोडी, तसेच राज्याचे मावळते मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची मनधरणी करण्यासाठी भाजपने घेतलेला वेळ यामुळे शपथविधीचा कार्यक्रम रखडला. अखेर विधानसभा निवडणुकीच्या निकालानंतर तब्बल १३ दिवसांनी देवेंद्र फडणवीस यांनी आज महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली आहे. या भव्यदिव्य शपथविधी सोहळ्याला देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह हे स्वत: उपस्थित होते. या शपथविधी सोहळ्याला तब्बल २२ राज्याच्या मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांनी हजेरी लावली होती. या कार्यक्रमात संत-महंतांनी देखील हजेरी लावली. त्यांनी महाराष्ट्राच्या या नव्या सरकारला आशीर्वाद दिले. तसेच क्रिकेट, सिनेक्षेत्रापासून विविध क्षेत्रात नाविन्यपूर्ण कामगिरी करुन आपला ठसा उमटवणाऱ्या दिग्गजांनाही या कार्यक्रमाचं निमंत्रण होतं. त्यामुळे अशा शेकडो दिग्गज व्यक्तीमत्त्वांनी या भव्य कार्यक्रमाला हजेरी लावली. देवेंद्र फडणवीस यांनी आज मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतल्यानंतर आज महाराष्ट्रात खऱ्या अर्थाने पुन्हा एकदा 'देवेंद्र'पर्वाला सुरुवात झाली आहे.

धनंजय मुंडेंचे सिरसाळा एमआयडीसी

सातत्याने पाठपुरावा केला आहे. धनंजय मुंडे यांनी नुकत्याच संपन्न झालेल्या विधानसभा निवडणुकीत शिरसाळा येथील मंजूर असलेल्या एमआयडीसीला पूर्णत्वाकडे नेऊन या ठिकाणी पायाभूत सुविधांची निर्मिती करणे तसेच येथे उद्योगांना निमंत्रित करण्याचे आश्वासन दिले होते; या शब्दाला पूर्ण करण्यासाठी आणखी आमदार म्हणून शपथ घेणे सुद्धा बाकी असतानाच मुंडेंनी आपल्या कामाला सुरुवात केल्याचे पाहायला मिळत आहे. सिरसाळ्यात सुमारे २०० हेक्टर पेक्ष्या अधिक क्षेत्र हे एमआयडीसी म्हणून घोषित करण्यात आले असून त्यापैकी ७८ हेक्टर पेक्षा अधिक जमीन आतापर्यंत अधिग्रहित करण्यात आली आहे. सदर ठिकाणास राष्ट्रीय महामार्ग, रेल्वे सह दळणवळणाच्या सोयी व पाण्याची उपलब्धता प्रमाणात असल्याने येथे उद्योग उभारणीस मोठा वाव आहे. त्यामुळे सदर एमआयडीसी पूर्ण झाल्यास याठिकाणी मोठ्या प्रमाणात उद्योग निर्मिती करण्याचा धनंजय मुंडे यांचा प्रयत्न आहे.

पान ६ वरून...

केज तालुक्यातील

या कंपनीची झाली आहे. त्याचबरोबर केज तालुक्यातील सर्व टॉवर सुरु करुन त्यावर ५ नेटवर्क सेवा सुरु करण्याची मागणी पत्रकार दिनकर जाधव यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केली आहे.

देवेंद्र फडणवीस यांनी मुख्यमंत्रीपदाची

पेढे वाटून फटाके फोडून जल्लोष साजरा करण्यात आला होता यावेळी नागरिकांसह पदाधिकाऱ्यांसह कार्यक्रत्यांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती.

कुंबेफळ गावात हरणाचा पाडला

या घटनेमुळे कुंबेफळ परिसरातील ग्रामस्थांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले आहे. परंतू, 'त्या' हरणाचा फडशा मोकाट कुत्र्याने पाडला असल्याची माहिती वनविभागाकडून देण्यात आली आहे.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण

उपस्थित होते. आयोजित शिबिरात एकूण ६० रक्तदात्यांनी आपले रक्त दान करून या सामाजिक उपक्रमात सहभाग नोंदवला. रक्तदात्यांना नाष्टा, बिस्किट व चहाची व्यवस्था संयोजन समितीच्या वतीने करण्यात आली होती. परळी वैद्यनाथ ब्लड बँकेच्या वतीने रक्त डोनेशन करुन घेण्यात आले. रक्तदान शिबिर व्यवस्थित रित्या पार पाडण्यासाठी भीम आर्मीच्या पदाधिकाऱ्यांसह सचिन देशमाने, किरण धुमाळ, अमोल देशमाने, प्रदीप देशमाने, सिद्धार्थ देशमाने, दीपक देशमाने आदिंनी परिश्रम घेतले.

उपळी येथील काम निकृष्ट दर्जाचे झाल्याने

नसून रोडवर पडलेल्या भेगामध्ये वाहन जाऊन अपघात होऊन वाहन पुलाच्या खाली जाऊन नागरिकांचा जीवही जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. असे काही अपघात झाले तर याची सर्वस्वी जबाबदारी ही संबंधित अधिकारी व गुत्तेदार यांची राहील याची नोंद घेऊन सदरील रस्त्याची वरिष्ठ कंट्रोलर मार्फत चौकशी करून बोगस रास्ता करणाऱ्या अधिकारी व गुत्तेदार याची बिल न देता त्यांच्यावर योग्य कार्यवाही करावी. हा रस्ता मुख्य दळणवळणीचा असूनपुढील कामावर लक्ष देऊन उत्कृष्ट दरजेचा रास्ता करून घ्यावा अश्या आशयाचे निवेदन अंतर राष्ट्रीय मानवाधिकार महासंघचे जिल्हाध्यक्ष शेख एजाज यांनी दिले आहे.

हळद पिकावर करप्या

फवारनी करून हैराण झाले आहेत आज पर्यंत विविध प्रकारच्या किटकनाशकाची फवारनी करून बराच पैसा खर्च केला गेला तरीही या पिकावरील करप्या रोगाचा प्रादुर्भाव काहि करताहि कमी होताना दिसत नाहि आधीच कर्ज बाजारी झालेल्या शेतकरी वर्गाची दुर्दैवी अवस्था असताना त्यात पुन्हा भर पडली आहे ति हळद पिकावर झालेल्या अमाप खर्चाची यामुळे शेतकरी वर्ग चिंताग्रस्त झाला आहे

ज्ञान, संस्कार, आहार व आरोग्यावर

आले होते. या कार्यक्रमासाठी अध्यक्ष म्हणूणधारूर आर्य समाजचे प्रधान प्रमोदकुमार तिवारी होते तर प्रमुख मार्गदर्शक दयानंद महाविद्यालय लातूरचे सेवानिवृत्त प्रा. चंद्रेश्वरजी शास्त्री तसेच प्रमुख अतिथी म्हणून अभिषेकजी शास्त्री, अड प्रमोदकुमार मिश्रा सोमनाथअप्पा कांबळे, कमलाकर इंदूरकर उद्धव खाडे हे मान्यवर यावेळी उपस्थित मान्यवरांचे विद्यालयाच्या व स्वागत सत्कार करून केला उपस्थित मान्यवर अड मिश्रा व खाडे यांनी भजन व गीत गायन करत विद्यार्थ्यांमध्ये आनंददायी वातावरण निर्माण केले. या वेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना प्रा. चंद्रेश्वरजी शास्त्री यानी विद्यार्थ्यानी शिस्त व नियोजनबध्द वागणे गरजेचे असुन आहार व आरोग्याची काळजी प्रत्येकाने घेतली पाहीजे. पूस्तकी ज्ञाना बरोबर समाजातील सर्व प्रकारचे ज्ञान अवगत केले पाहीजे आपले संस्कार व संस्कृती टिकवण्या साठी सतत प्रयत्न केला पाहीजे असे सांगीतले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन शिक्षक मुंजाराम निरडे तर आभार शिक्षक सचिन चव्हाण यांनी केले. यावेळी मोठ्या संख्येने विद्यार्थी व शिक्षकवृंद उपस्थित होते.

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
शुक्रवार दि.६ डिसेंबर २०२४

माऊली विद्यालयात खा.रजनी पाटील यांचा वाढदिवस उत्साहात

बीड : आज दिनांक ५ डिसेंबर रोजी माऊली विद्यापीठ केज संचलित आदर्श बालवाडी व माऊली प्राथमिक विद्यालय बीड येथे मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

कार्यक्रमांसाठी माऊली विद्यापीठ केज चे संचालक नवनाथ थोटे,मुख्याध्यापक संतोष माने,पालक प्रतिनिधी श्री.कदम सर व सर्व सहशिक्षक तसेच विद्यार्थी यांची उपस्थिती होती.प्रसंगी खा.रजनी पाटील यांच्या जन्मदिनाचे

औचित्य साधून निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.निबंध स्पर्धेचे बक्षीस वितरण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.यानंतर शाळेचे मुख्याध्यापक संतोष माने तसेच प्रमुख अतिथी नवनाथ थोटे यांनी ताईंना जन्मदिनाच्या शुभेच्छा दिल्या.नवनाथ थोटे यांनी आपल्या मनोगतातून ताईंच्या समाजिक तसेच राजकीय कार्याचा गौरव करत त्यांच्या भावी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.इ.७ वी ची विद्यार्थिनी अनागता सुरवसे हिने तिच्या गीतातून शुभेच्छा देत कार्यक्रमाचा समारोप केला.कार्यक्रमाचे सूत्रसंचलन रमाकांत डोळस यांनी केले.

जागतिक दिव्यांग दिनानिमित्त मार्गदर्शन शिबिर

अंबाजोगाई। प्रतिनिधी

येथील नगरपरिषद अंबाजोगाई, दीनदयाळ अंत्योदय योजना – राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान अंतर्गत राजमाता जिजाऊ महिला शहरस्तर संघ, शहर उपजीविका केंद्र यांच्या संयुक्त पुढाकाराने जागतिक दिव्यांग दिनानिमित्त विविध घटकांतील दिव्यांगांना नगरपरिषदेमार्फत राबविण्यात येत असलेल्या योजनेची माहिती व त्या संदर्भात ऑनलाईन पद्धतीने करावयाचा अर्ज, त्यासाठी लागणारे आवश्यक कागदपत्र इत्यादी बाबतची माहिती मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले.

नगरपरिषद अंबाजोगाई, दीनदयाळ अंत्योदय योजना – राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान (डे-एनयुएलएम) अंतर्गत राजमाता जिजाऊ महिला शहरस्तर संघ, शहर उपजीविका केंद्र, अंबाजोगाई यांच्या संयुक्त विद्यमानाने, विविध घटकांतील दिव्यांगांना नगरपरिषदेमार्फत राबविण्यात येत असलेल्या योजनेची माहिती व त्या संदर्भात ऑनलाईन पद्धतीने करावयाचा अर्ज, त्यासाठी लागणारे आवश्यक कागदपत्र इत्यादी बाबतची माहिती होण्यासाठी, जागतिक दिव्यांग दिनानिमित्त मार्गदर्शन शिबिर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सदरील कार्यक्रमात नगरपरिषदेमार्फत राबविण्यात येत असलेल्या दीनदयाळ अंत्योदय योजना – राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान अंतर्गतच्या विविध घटकांची माहिती, पीएम स्वनिधी योजना, स्वनिधी से समृद्धी योजना, पीएम विश्वकर्मा योजना, प्रधानमंत्री आवास योजना, स्वच्छ महाराष्ट्र अभियान, दिव्यांग कल्याणकारी योजना, इत्यादी विविध योजनांची माहिती देण्यासाठी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते . कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नगरपरिषदेच्या मुख्याधिकारी प्रियंका टोंगे या होत्या. सदरील कार्यक्रमाप्रसंगी महाराष्ट्र दिव्यांग संघटनेचे संभाजीराव लांडे व नगरपरिषदचे कार्यालयीन अधीक्षक सय्यद अन्वर यांची प्रमुख उपस्थिती होती. या प्रसंगी सर्वप्रथम डॉ.हेलन केलर यांच्या प्रतिमेस मुख्याधिकारी प्रियंका टोंगे यांनी पुष्पहार अर्पण करून प्रतिमापूजन केले. कार्यक्रमाचे प्रस्ताविक शहर अभियान व्यवस्थापक दिलीप तांबारे यांनी केले. त्यांनी शहरी भागातील दारिद्र्यरेषेखालील महिला बचत गटातील दिव्यांग सदस्य, तसेच स्वयंरोजगार, पीएम स्वनिधी व पीएम विश्वकर्मा योजनेअंतर्गत लाभ देण्यात आलेले दिव्यांग सदस्य यांना कार्यक्रम आयोजित करण्याबाबतचा उद्देश तांबारे यांनी सांगितला. कार्यक्रमाचे अध्यक्ष मुख्याधिकारी श्रीमती प्रियंका टोंगे यांनी उपस्थितांशी संवाद साधताना सांगितले की, शहरातील दिव्यांग लाभार्थींना विविध योजनांचे लाभ देण्यासाठी नगरपरिषद प्रशासन कटिबद्ध आहे, तसेच दिव्यांगांच्या काही कार्यालयीन व बँक स्तरावरील अडचणी असतील तर त्यांनी सांगाव्यात, प्राधान्याने त्या अडचणी सोडविण्यासाठी माझे सहकार्य राहील असे त्यांनी सांगितले. तसेच मुख्याधिकारी श्रीमती प्रियंका टोंगे, कार्यालयीन अधीक्षक सय्यद अन्वर, दिलीप तांबारे, समीर शेख, श्रीमती रोहिणी कडेकर यांनी उपस्थित सर्व दिव्यांग लाभार्थींचे गुलाबपुष्प देऊन स्वागत केले. या प्रसंगी महाराष्ट्र राज्य दिव्यांग संघटनेचे संभाजीराव लांडे यांनी आपले मनोगत व्यक्त करताना दिव्यांग लाभार्थींसाठी शासनाच्या विविध योजना व त्याचा विनियोग कशा पद्धतीने करणे आवश्यक आहे. या संदर्भात उपस्थितांना सविस्तर मार्गदर्शन केले. शहर अभियान व्यवस्थापक समीर शेख यांनी उपस्थित दिव्यांग लाभार्थींना देण्यात येत असलेल्या अभियानाअंतर्गतच्या प्रशिक्षण, स्वयंरोजगार, पीएम स्वनिधी, स्वनिधी से समृद्धी योजना, इत्यादी योजनेच्या माध्यमातून दिव्यांग लाभार्थींना लाभ घेण्यासाठीच्या संधी उपलब्ध आहेत असे त्यांनी याप्रसंगी सांगितले. तसेच राजमाता जिजाऊ शहर संघाच्या अध्यक्षा श्रीमती रोहिणी कडेकर यांनी शहरी भागातील जे दिव्यांग लाभार्थी आहेत त्यांनी स्वतःच्या पायावर उभा राहून केलेले व्यवसाय व त्या अंतर्गत उत्पादित केलेल्या वस्तु, साहित्याची विक्री करण्यासाठी आमचे शहर उपजीविका केंद्र (सीएलसी) सेंटर कटिबद्ध असून, दिव्यांग लाभार्थींनी उत्पादित केलेल्या वस्तू व मालाची विक्री करण्यासाठी करार करण्यासाठी पुढे यावे असे आवाहन त्यांनी कार्यक्रमाप्रसंगी केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी डे-एनयुएलएम विभागाच्या सोनाली शिंदे, प्रियंका राऊत, सीआरपी श्रीमती निर्गुण हावळे, श्रीमती अर्चना सातभाई, श्रीमती सीमा खतीब, श्रीमती रेखा पांचाळ आदींसह इतरांनी परिश्रम घेतले. या कार्यक्रमासाठी कार्यालयीन कर्मचारी लखन ओव्हाळ, नारायण हाके, चव्हाण तसेच शहरस्तर संघाच्या सचिव श्रीमती वर्षा सूर्यवंशी, सदस्या श्रीमती पपीता शिंगाडे, श्रीमती मुमताज पठाण यांनी देखील कार्यक्रम यशस्वितेसाठी सहभाग नोंदविला. कार्यक्रमासाठी उपस्थित राहिलेले मान्यवर व दिव्यांग लाभार्थी यांचे शहरस्तर संघाच्या अध्यक्षा श्रीमती रोहिणी कडेकर यांनी आभार व्यक्त केले.

थोडक्यात

नविद मुश्रीफ यांची राजकिशोर मोदी यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट

अंबाजोगाई(प्रतिनिधी):- सरसेनापती संताजी घोरपडे शुगरचे अध्यक्ष तथा राज्याचे वैद्यकीय शिक्षण मंत्री ना हसन मुश्रीफ यांचे सुपुत्र नविद मुश्रीफ हे अंबाजोगाई शहरात आले असतांना त्यांनी राजकिशोर मोदी यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट दिली. यावेळी त्यांचे स्वागत श्री बालाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे कार्यकारी संचालक संकेत राजकिशोर मोदी यांनी शाल फेटा व पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. याप्रसंगी नविद मुश्रीफ व संकेत मोदी यांच्यात नुकत्याच संपन्न झालेल्या विधानसभा निवडणुकीच्या संदर्भात तसेच राजकीय ,सामाजिक त्याचबरोबर शैक्षणिक विषयावर सांगोपांग चर्चा झाली. उभयतांनी आपापल्या क्षेत्रातील विविध प्रकारचे अनुभव व किस्से सांगितले. संकेत मोदी यांनी अंबाजोगाई शहरासाठी राजकिशोर मोदी यांनी मागील चाळीस वर्षात राबविलेल्या विविध विधायक उपक्रमाविषयी माहिती नविद मुश्रीफ यांना दिली. त्याचबरोबर अंबाजोगाई शहरात सुरू केलेल्या आर्थिक संस्थेची देखील सविस्तरपणे चर्चा केली. नविद मुश्रीफ यांनी देखील अंबाजोगाई पिपल्स को ऑप बँक व त्यांचा विस्तारीत शाखांविषयी जाणून घेतल्यावर आनंद व्यक्त करत राजकिशोर मोदी व संकेत मोदी यांचे अभिनंदन केले. मोदी लर्निंग सेंटरच्या माध्यमातून आजपर्यंत अनेक मोठमोठे अधिकारी, डॉक्टर, इंजिनिअर , वैज्ञानिक तसेच खेळाडू तयार झाल्याचे समजल्यावर अंबाजोगाई शहरातील शैक्षणिक वातावरण व येथील यशस्वी विद्यार्थ्यांचे देखील कौतुक व अभिनंदन करत आपल्या वतीने देखील कार्यक्षेत्रात असेच विधायक उपक्रम राबविण्याची इच्छा व्यक्त केली.

बजरंग सोनवणेविरोधात कडक कारवाई करा

पाटोदा । प्रतिनिधी

राष्ट्रवादी शरद पवार गटाचे खा. बजरंग सोनवणे यांनी बीडमधील एका कार्यक्रमात पत्रकारांबद्दल अपशब्द वापरून टीका केली होती. याचे पडसाद जिल्ह्यासह राज्यभर उमटत आहेत. पाटोद्याचे तहसीलदार आणि पोलिस निरीक्षक यांना निवेदन देऊन सोनवणे यांच्यासह त्यांचे समर्थन करणाऱ्या सुरज खोडसे नामक व्यक्तीवर गुन्हा दाखल करण्याची मागणी केली आहे. बजरंग सोनवणे यांनी केलेल्या वादग्रस्त वक्तव्याचा पाटोदा मराठी पत्रकार परिषदेचे वतीने निषेध व्यक्त करण्यात आला. तसेच खा. सोनवणे यांच्या विरुद्ध पत्रकार संरक्षण कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात यावा, अशी मागणी केली आहे. तसेच खा.सोनवणे यांच्या वक्तव्याचे सोशल मीडियावरून समर्थन करणारा पक्षाचा पदाधिकारी सुरज लक्ष्मण खोडसे याच्यावरही कारवाईची मागणी पत्रकारांनी केली आहे. आठ दिवसात कारवाई न झाल्यास राज्यातील पत्रकारांना घेऊन राज्यभर तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही तहसीलदार व पोलिस निरीक्षकांना लेखी निवेदनाद्वारे पत्रकारांनी दिला आहे. यावेळी मराठी पत्रकार परिषदेचे सर्व पदाधिकारी

तालुका अध्यक्षपदी श्यामसुंदर पांचाळ यांची निवड

माजलगाव। प्रतिनिधी

प्रभू विश्वकर्मा सुतार समाज संघटनेच्या माजलगाव तालुकाध्यक्षपदी गोविंदपुरचे उपसरपंच श्यामसुंदर नामदेव पांचाळ यांची निवड करण्यात आली.गुडलक लॉन्स येथे गुरुवार दि.०५ डिसेंबर रोजी समाज बांधवांच्या वतीने ही निवड करण्यात आली. माजलगाव तालुक्यात सामाजिक कार्यात अग्रेसर अणारे श्यामसुंदर पांचाळ यांची माजलगाव तालुक्यात सर्वत्र ओळख आहे.सुतार समाजाच्या अनेक सामाजिक कार्यात त्यांचे योगदान.समाजाच्या विद्यार्थ्यांसाठी त्यांनी काम केले आहे.सुशिक्षित बेरोजगार,सुतार कामगार यांना शासकीय सवलती मिळाव्यात यासाठी त्यांचा नेहमीच

प्रयत्न सुरू असतो.दरम्यान शामसुंदर पांचाळ यांचा प्रभू विश्वकर्मा सुतार समाज संघटनेच्या निवडीने सर्वत्र त्यांचे अभिनंदन होत आहे. या निवडी वेळी बालासाहेब पांचाळ अशोक डिगंबरे,सुभाष ननवरे, गणेश पोचाळ,भागीरथ पांचाळ, गोविंद पांचाळ,रामभाऊ पांचाळ,मसुनिल पांचाळ,रामकृष्ण पांचाळ, किशोर पांचाळ,जगदीश शिलपे,उत्तरेशोर पांचाळ,नारायण पांचाळ, उद्धवराव पांचाळ, रामकिसन पांचाळ तात्या पांचाळ यांची उपस्थिती होती. दरम्यान ओबीसी महासंघाचे जिल्हाध्यक्ष विलास नेमाने यांनी पांचाळ यांचे स्वागत करून त्यांना पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या.

आज महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री म्हणून राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष अजितदादा पवार हे शपथबद्ध होत आहेत, त्या पार्श्वभूमीवर मुंबईतील देवगिरी निवासस्थानी आ.धनंजय मुंडे यांनी अजित दादांची भेट घेऊन त्यांना शुभेच्छा दिल्या. यावेळी माजी आ.अमरसिंह भैय्या पंडित, माजी आ.संजय भाऊ दौंड आदी उपस्थित होते.

दत्त जयंती मार्गशीर्ष नवरात्र महोत्सवात विविध धार्मिक कार्यक्रम

अंबाजोगाई। प्रतिनिधी

अनेक वर्षाची परंपरा लाभलेला तसेच सांस्कृतिक व कलात्मक दृष्टीने महत्वपुर्ण व असलेला दत्तजयंती मार्गशिर्ष नवरात्र महोत्सव ८ डिसेंबर ते १६ डिसेंबर या कालावधीत दत्त संस्थान थोरले व धाकटे देवघर येथे संपन्न होत असून यात विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आल्याची माहिती पत्रकार राहुल देशपांडे यांनी दिली.दत्तजयंती नवरात्र महोत्सवानिमित्त दत्त संस्थान थोरले देवघर येथे संपन्न होणाऱ्या कार्यक्रमात सकाळी अभिषेक, मंत्र अनुष्ठान, वेदोक्त श्लोक, स्त्रोत्र, अष्टक, जयंती, महानिरांजन, प्रदक्षिणा, दासोपंत रचित भजन आदी कार्यक्रम होतील.

८ ते १३ डिसेंबर या कालावधीत रात्रो नृत्य,गायन,प्रवचन, किर्तन दि.१० ते १३ डिसेंबर रोजी दुपारी धार्मिक कार्यक्रम ११ डिसेंबर रोजी रात्री उशिरा मंदीर परिसरात १२ व १४ डिसेंबर रोजी सायंकाळी व रात्री उशिरा मंदिर परिसरात पालखी १४ डिसेंबर रोजी दत्तजयंती निमित्याने दुपारी भक्ती गीत गायन आणि सायंकाळी गुरूपुजन व अवतारोत्सव सोहळा १५ डिसेंबर रोजी प्रातःसमयी भजन, पालखी व दत्त सहस्त्रनाम, षोडशावतार हवन (होम) होवुन पुर्णाहुतीचा कार्यक्रम होईल. दि.१६ डिसेंबर रोजी प्रातःसमयी भजन,पालखी सोहळा त्यानंतर लळीत लोककला सादरीकरणाने दत्तजयंती मार्गशीर्ष नवरात्र महोत्सवाची सांगता होईल.या सर्व कार्यक्रमास भाविकांनी उपस्थित राहण्याचे आवाहन महोत्सव समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

प्रत्येक गावात स्त्रोत तपासणी संच उपलब्ध

पाच कुशल महिला व जलसुरक्षक करणार पिण्याच्या पाण्याची स्त्रोत तपासणी

बीड। प्रतिनिधी

जिल्ह्यात प्रत्येक गावात पिण्याचे पाण्याचे स्त्रोत तपासण्यासाठी जैविक व रासायनिक तपासणी संच उपलब्ध करून देण्यात आलेला आहे. पाच कुशल महिला व जलसुरक्षक यांना जबाबदारी देण्यात आली आहे. पाणी गुणवत्ता अभियानात सुरू असलेल्या या उपक्रमाचे सनियंत्रण व अंमलबजावणी करिता तपासणी संच उपलब्धता व उपयोगिता बाबत राज्यस्तरावरील पथक जिल्ह्यात पाहणी करत आहे. या पथकात डॉ. मुजावर, मनीषा गुरव व आदिती पाकटे या अधिकाऱ्यांचा समावेश आहे.

बीड जिल्ह्यात १३५० गावातील जवळपास दहा हजार पिण्याच्या पाण्याचे स्त्रोत गावातच तपासणी करिता पाच कुशल महिला व जलसुरक्षक यांची नियुक्ती करण्यात आली आहे .पाणी तपासणी संदर्भात सर्वांना प्रशिक्षित देखील करण्यात आले आहे. शिवाय गावातच पाणी तपासणी करण्याकरिता जैविक व रासायनिक तपासणी संच शासनाकडून उपलब्ध करून देण्यात आलेला आहे. यासंबंधी माहिती घेण्याकरिता राज्यस्तरावरून १६ गावांची पथकाकडून पाहणी सुरू आहे. जैविक व रासायनिक तपासणी केल्यानंतर जो अहवाल येईल त्यावर काय उपाययोजना करायचे आहे किंवा गावातील लोकांसोबत संवाद साधून पिण्याच्या पाण्यासंबंधी जनजागृती करण्याची मोठी जबाबदारी गावातील या सहा कर्मचाऱ्यांवरती देण्यात आलेली आहे. अंगणवाडी सेविका, तसेच आशा आरोग्य कर्मचारी , बचत गटाच्या सदस्य अशा पाच महिला व जलसुरक्षक हे सर्वजण मिळून या पथकाला पाणी तपासणीची कार्यवाही प्रत्यक्षात करून दाखवत आहे शिवाय यापूर्वी झालेल्या तपासण्याबाबत देखील पथकाकडून माहिती घेण्यात येत आहे. जिल्ह्यातील गटविकास अधिकारी , तालुका आरोग्य अधिकारी,तसेच प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी, विस्तार अधिकारी पंचायत व आरोग्य तसेच ग्रामपंचायत अधिकारी आरोग्य कर्मचारी यांच्यासोबत पथकातील अधिकारी संवाद साधणार आहे. प्रत्यक्षात सुरू असलेले या उपक्रमात येणाऱ्या अडचणी व त्यावर आणखी काय उपाययोजना करता येईल याबाबत ची माहिती शासनाला सादर करण्यात येणार आहे शिवाय ग्रामपंचायत स्तरावर आणखीन काय सुविधा उपलब्ध करून देण्यात येईल याची शिफारस देखील गटविकास अधिकारी यांच्याकडून हे पथक घेत आहे.

दिंद्रुडच्या काटकर वाड्यातील शेकडो वर्षांची परंपरा

खंडोबा काठीच्या आरतीला शेकडो भक्तांची गर्दी

दिंद्रुड। प्रतिनिधी

माजलगाव तालुक्यातील दिंद्रुड येथे काटकर परिवाराला खंडोबाच्या काठीचा मान आहे. कार्तीक त्रयोदशी ते मार्गशीर्ष पंचमी या आठ दिवसांसाठी मागच्या शेकडो वर्षांपासून काटकर वाड्यात खंडोबाच्या काठीची प्रतिष्ठापना केली जाते. दररोज सायंकाळी ८ ते १० या वेळेत आरती व हालकींच्या तालावर वारू खेळण्यासाठी वाघे व भक्त मंडळी नियमित गर्दी करतात. यावर्षी २८ नोव्हेंबर ते ६ डिसेंबर या काळात हा सोहळा भक्ती भावाने साजरा करण्यात येत आहे.महाराष्ट्रातील लाखो भाविक भक्तांचे आराध्य दैवत असलेल्या मल्हारी म्हाळसाकांत खंडेरायाच्या महोत्सवाच्या पार्श्वभूमीवर विविध धार्मिक विधींना सुरुवात झाली आहे. कार्तिक वद्य त्रयोदशी च्या मुहूर्तावर खंडोबाच्या काठीला तेल लावण्याचा कार्यक्रम असतो. ८ दिवसांच्या काळात दररोज खंडोबाच्या काठी समोर आरती केली जाते. दिंद्रुड व पंचक्रोशीतील वाघे (खंडोबाचे भक्त) झांज व हालखीच्या निनादात भंडारा उधळून दोन तास

वारू हा खेळ खेळतात. यावर्षी मार्गशीर्ष शुद्ध पंचमी (६ डिसेंबर रोजी) शुक्रवारी नागदिवे पूजन व खंडोबा काठीची वाजत गाजत भव्य मिरवणूक काढण्यात येणार आहे.

खंडोबाची काठी ही जवळपास ३५ ते ४० फूट उंच आहे. प्रतिवर्षी भाविक भक्त मोठ्या भक्तीभावाने या काठीचा उत्सव साजरा करतात. दिंद्रुड ते देवदहिफळ अशी काठीची वाजत गाजत मिरवणूक काढली जाते.

काठीच्या मिरवणुकीचा हा भव्य दिव्य सोहळा पाहण्यासाठी भाविकांची मोठी गर्दी होते. दिंद्रुड येथील बाजारतळावर काठीची आरती केल्यानंतर ही काठी देवदहिफळ येथील श्रीक्षेत्र खंडोबा देवस्थानाकडे रवाना होते. खंडोबा हे कुलदैवत असलेल्या विविध जाती धर्मातील भक्तगण मोठ्या संख्येने सर्व कार्यक्रमांना उपस्थिती लावतात. 'येळकोट येळकोट जय मल्हार चा गजर व भंडाऱ्याची उधळन करुन साजरा होणाऱ्या या कार्यक्रमाचा लाभ घेण्याचे आवाहन काटकर परिवाराच्या वतीने करण्यात आले आहे.

आठ दिवसांच्या कार्यकाळात बहुतांश वारूंच्या अंगात येते, अंगावर चाबकाचे फटकारे मारून घेत भाविक खंडोबांप्रति असलेली श्रध्दा व्यक्त करतात. देवदहिफळ ग्रामस्थ खंडोबाची काठी व विविध ठिकाणावरून येणाऱ्या मानाच्या पालखीचे स्वागत करतात. महिनाभर ही काठी खंडोबा मंदिरात ठेवली जाते. चंपाषष्ठीच्या सूर्योदयापूर्वी हजारो भाविकांच्या उपस्थितीत खंडोबाचा विवाह सोहळा पार पडतो. त्यानंतर खंडोबा यात्रेला सुरुवात होते.

ऊस दराबाबत साखर कारखानदार, शेतकरी संघटनांची बैठकी

कोल्हापूर : मागील ऊस दरातील फरक व चालू हंगामातील पहिली उचल प्रतिटन ३ हजार ७०० रुपये मिळावी या मागणीसाठी विविध शेतकरी संघटना आंदोलन करत आहेत. या आंदोलनाच्या रेट्यामुळे साखर कारखानदार, शेतकरी संघटना यांची बैठक सोमवारी (दि ९) सकाळी ११ वाजता आयोजित करण्यात आली आहे. कोल्हापूर जिल्हाधिकारी कार्यालयात ताराराणी सभागृहात ही बैठक घेण्यात येणार आहे.

कोल्हापूर जिल्ह्यातील विविध शेतकरी संघटनांनी ऊस दरावरून जोरदार आंदोलन सुरू केले आहे. याचबरोबर स्वाभिमानी शेतकरी संघटनेकडून जयसिंगपूर येथे झालेल्या ऊस परिषदेत दराची मागणी करण्यात आली आहे. यामध्ये मागील २०२३-२४ या गळीत हंगामातील उसाला प्रतिटन २०० रुपये अंतिम हप्ता व सध्याचा २०२४-२५ या गळीत हंगामासाठी पहिली उचल प्रतिटन ३ हजार ७०० रुपये मिळावे, अशी मागणी केली आहे. तोडणीसाठी मजुरांकडून व ऊस तोडणी

मशिन मालकांकडून एकरी ५ ते १० हजार रुपयांची मागणी करून शेतकऱ्यांची पिळवणूक केली जात आहे. या सर्व विषयांवर बैठकीत चर्चा होणार आहे. या बैठकीसाठी साखर कारखानदार, शेतकरी संघटना प्रतिनिधी यांनी उपस्थित राहावे, असे आवाहन प्रादेशिक साखर सहसंचालक गोपाळ मावळे यांनी केले आहे.

२५ ऑक्टोंबर रोजी जयसिंगपूर येथे झालेल्या ऊस परिषदेमध्ये चालू गळीत हंगामासाठी प्रतिटन पहिल्या उचल जाहीर करावी. चालू गळीत हंगामामध्ये साखर कारखान्यांनी पहिल्या ५० दिवसात कार्यक्षेत्रातीलच ऊस गाळप करावा. पुरामध्ये बाधीत झालेल्या ऊसाची प्राधान्याने पहिल्यांदा तोड करण्यात यावी अशी मागणी स्वाभिमानी शेतकरी संघटनेकडून करण्यात आली आहे.ऊस तोडणी मजूरांची मजूरी वाढूनही व तोडणी वाहतूक एफआरपी मधून कपात करूनही ऊस तोडणीसाठी शेतकऱ्याकडून एकरी ५ ते १० रूपयाची मागणी केली जात आहे. यामुळे अशा पध्दतीने लूट करणाऱ्या संबधित तोडणी वाहतूकदार यांच्यावर कडक कारवाई करण्यात यावी या मुद्याबाबत स्वाभिनानीने साखर आयुक्त यांना निवेदन दिले होते.

मोसंबी बागांची सुरुवातीच्या काळात घ्यावयाची काळजी

आंबिया बहर चांगला फुटण्यासाठी वाढत्या थंडीचा फायदा होणार हे स्पष्ट आहे. त्यामुळे येत्या २० डिसेंबरपर्यंत शेतकऱ्यांना आपल्या बागांना ताण देता येईल. सुरुवातीच्या काळात आवश्यक खबरदारी घेतली तर आंबे बहर शेतकऱ्यांना चांगला फायद्याचा ठरेल, असे प्रतिपादन मोसंबी संशोधन केंद्र व हिमायत बाग फळ संशोधन केंद्राचे माजी प्रभारी अधिकारी डॉ. एम. बी. पाटील यांनी केले.

सुरुवातीला शेतकऱ्यांनी झाडांच्या खोडाला बोर्डो पेस्ट लावणे, काडी काढणे, एक टक्का बोर्डो मिश्रण फवारणी आदी कामे तज्ज्ञांच्या सल्ल्याने आवर्जून करावीत. बागेतील पाच वर्षांपेक्षा जास्त वयाच्या झाडांना प्रति झाड ५० किलो शेणखत द्यावे व आंतरमशागत करावी. सुरुवातीच्या काळातील ही पावले उचलली तर भविष्यात होणारी फळगळ रोखण्यास मोठी मदत होते.

केवळ रासायनिक बाबींचा वापर करून फळगळ रोखणे शक्य होत नाही. शेणखताचा वापर व सुचविलेली सुरुवातीची कामे करणे क्रमप्राप्त आहे. हे शक्य न झाल्यास फेब्रुवारीमध्ये दुसऱ्या पंधरवड्यात एक किलो युरिया अधिक ३० मिलि अल्फा नॅथ्थिल ॲसिटिक ॲसिड हे वाढनियंत्रक अधिक ३०० ग्रॅम बोरिक ॲसिड यांची पहिली फवारणी घ्यावी. त्यानंतर १५ मार्च ते १५ एप्रिल दरम्यान पोटॅशिअम नायट्रेट दीड किलो अधिक ४ ग्रॅम जीए यांची प्रति १०० लिटर पाण्यात मिसळून फवारणी घ्यावी. यानंतर तिसरी फवारणी मेमध्ये फेब्रुवारीतील पहिल्या फवारणीच्या शिफारशीनुसार पुन्हा घ्यावी. यामुळे पुढे जून, जुलैमध्ये होणारी फळगळ थांबविण्यास देखील मोठी मदत होते. जोराचा पाऊस झाल्यास झाडाच्या खालच्या फळांना माती लागून ती फळे सडणे व त्यामुळे गळ होणे हा एक प्रश्न आहे. त्यासाठी असा पाऊस झाल्यास मेटॅलॅक्सिल अधिक मॅन्कोझेब या संयुक्त बुरशीनाशकाची अडीच ग्रॅम प्रति लिटर पाणी या प्रमाणात फवारणी जमिनीवर घ्यावी. साधारणतः सप्टेंबर, ऑक्टोबरमध्ये लाल कोळीच्या प्रादुर्भावाने फळ काळे होण्याचे प्रमाण वाढते. हा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रॉपरगाइट दीड ग्रॅम प्रति लिटर पाणी या प्रमाणात फवारणी करावी.

आडसाली उसाचे पाचट काढण्याचे फायदे

ऊस लागवड केल्यानंतर उसाचे पाचट काढावे की न काढावे या द्विधा मनस्थितीत शेतकरी असतो. आपण बघितले तर प्रत्येक उसाच्या पेऱ्याजवळ उसाचे पान असते. सुरुवातीची आणि शेवटची पाने अरुंद व निमुळती दिसतात. मध्यंतरीची पाने १ ते २ इंच रुंद असतात. ही पाने जवळपास १ मीटर लांबीची असतात. पूर्ण वाढ झालेल्या उसाला हिरवी १० पाने असतात.

उभ्या उसातील पाचट काढण्याचे फायदे :

उसातील वाळलेले पाचट काढल्यामुळे पिकामध्ये हवा खेळती राहते. सूर्यप्रकाश मुळापर्यंत जातो त्यामुळे वाटरशुट म्हणजेच कोंब वाढण्यास मदत होते तसेच उसाची जाडी वाढते. सरीमधून जाणे-येणे सोपे होते त्यामुळे उसाला खते घालणे, ड्रेंचिंग करणे ही कामे करणे सहजरीत्या करता येतात. उसामध्ये फिरता येत असल्यामुळे उसातील कीड व रोग लक्षात येतात, त्यामुळे उपाययोजना करणे सोपे होते. १ एकर क्षेत्रातून सरासरी २ ते ३ टन पाचट मिळते. १ टन पाचटापासून सरासरी २० कि.ग्रॅ. नत्र, १० कि.ग्रॅ. स्फुरद व १० ते २० कि.ग्रॅ. पालाश इतके खत मिळते. पाचटामुळे जमिनीवर आच्छादन झाल्यामुळे तण नियंत्रणासाठी फायदा होतो. तसेच पाचटाखाली जिवाणूंची चांगली वाढ होते.

उस पाचट काढताना घ्यायची काळजी : आडसाली उसाचे पाचट डिसेंबर महिन्यापूर्वी म्हणजेच ऊस पाच ते सहा महिन्याचा झाल्यानंतर मोठ्या भरणीनंतर काढावे. आडसाली उसाचे पाचट डिसेंबरनंतर काढू नये कारण फेब्रुवारीपासून उन्हाळा सुरु झाल्यामुळे उन्हाच्या झळा आतमध्ये शिरतात त्यामुळे उसातील पाण्याचे बाष्पीभवन होते. त्यामुळे ऊस सुकल्यासारखा दिसतो.

उस पाचट काढताना हिरवी पाने काढू नयेत, कारण ऊस पिकाला लागणारे अन्न या पानामध्ये तयार होते. त्यामुळे हिरव्या पानाचे क्षेत्रफळ जेवढे कमी होईल तेवढे उसाची अन्न तयार करण्याची प्रक्रिया कमी होते. त्यामुळे उसाची जाडी वाढत नाही

बियाणासाठी ठेवलेल्या उसाचे पाचट काढू नये. फुले २६५, १०००१, ८००५ या वाणाच्या उसाचा पाला किंवा पाचट काढू नये. फुले २६५ या उसाचे पाचट काढल्याने डोळे फुटतात. ८६०३२ या वाणाच्या आडसाली उसाचे पाचट काढणे फायदेशीर ठरते. काढलेले उसाचे पाचट हे सरीमध्ये चांगल्या पद्धतीने कुजले तर त्याचे खत चांगले होते.

उभ्या उसातील सरीमध्ये एकरी १०० कि.ग्रॅ. सिंगल सुपर फॉस्फेट व ५० कि.ग्रॅ. युरिया पाचटावर टाकल्याने पाचट लवकर कुजते. तसेच पाचट कुजवण्यासाठी पाणी दिल्यानंतर प्रतिएकरी १ लिटर द्रवरूप डिकंपोझिंग कल्चरची फवारणी करावी. उसाचे पाचट शक्यतो एकदाच काढावे.

अननसाच्या पानांपासून गाई-म्हशींसाठी पौष्टिक चारा

शेतीसोबतच पशुपालन करून शेतकरी आपले उत्पन्न वाढवू शकतात. यासाठी शासनाकडून अनेक प्रकारच्या योजना राबविण्यात येत असून त्यातून त्यांना लाभ मिळत आहे. भारतातील दुधाचे उत्पादन दुधाच्या मागणीच्या प्रमाणात कमी असल्याने देशातील दुधाचे उत्पादन वाढविण्याच्या दिशेने सरकार प्रयत्नशील आहे. दूध उत्पादन वाढवण्यासाठी शेतकरी हंगामानुसार जनावरांना हिरवा व सुका चाराही देतात. परंतु पौष्टिक चाऱ्याच्या कमतरतेमुळे जनावरांच्या दूध उत्पादनावर परिणाम होत आहे.

दुभत्या जनावरांना कोणत्याही प्रकारचा चारा देता येत नाही, कारण त्यांची दूध उत्पादन करण्याची क्षमता चाऱ्यावर अवलंबून असते. अशा परिस्थितीत जनावरांचे दूध उत्पादन वाढवण्यासाठी त्यांना पोषक चारा देणे अत्यंत गरजेचे आहे. ही बाब लक्षात घेऊन भारतीय कृषी संशोधन परिषदेने (आयसीएआर) अननसाच्या पानांपासून पौष्टिक चारा बनवण्याची पद्धत सुचवली आहे, ज्यामुळे जनावरांचे दूध उत्पादन वाढू शकते. विशेष म्हणजे हा चारा जनावरांच्या आरोग्यासाठी तर चांगला आहेच पण दुधाचे प्रमाण वाढवण्यासही उपयुक्त आहे.

जनावरांच्या चाऱ्यात अननसाच्या पानांचा वापर : भारतीय कृषी संशोधन परिषदेच्या म्हणण्यानुसार अननसाची पाने शास्त्रोक्त पद्धतीने जतन करून चारा बनवता येतो. या चाऱ्याला टोटल मिक्स्ड रेशन म्हणतात. या एकूण मिश्र रेशनमध्ये अनेक खाद्यपदार्थ एकत्र मिसळून जनावरांना खायला दिले

जातात. टीएमआरमध्ये चाऱ्यासोबत संपूर्ण कापूस सरकी, धान्ये, प्रथिने, खनिजे आणि जीवनसत्त्वे मिसळून गायी आणि म्हशी दुभत्या जनावरांसाठी खाद्य तयार केले जातात. याप्रमाणेच अननसाच्या पानांचाही टीएमआर पशुखाद्य तयार करण्यासाठी वापर केला जाऊ शकतो. केरळमधील एर्नाकुलममध्ये अननसाच्या पानांचा वापर जनावरांचा चारा बनवण्यासाठी केला जात आहे. केरळमध्ये अननसाची मोठ्या प्रमाणावर लागवड केली जाते. अशा परिस्थितीत जनावरांचा चारा बनवण्यासाठी त्याची पाने वापरली जात आहेत.

जनावरांसाठी पौष्टिक चारा बनवण्याची पद्धत : आएसीएआर नुसार, सर्वप्रथम अननसाच्या पानांची वर्गवारी करावी. कापलेली किंवा खराब झालेली पाने त्यातून काढून टाकावीत. आता फक्त १०० किलो चांगली पाने घ्या आणि त्यात २ किलो गूळ मिसळा. या मिश्रणात अर्धा किलो मीठ देखील घालायचे आहे. आता हे संपूर्ण मिश्रण हवाबंद भांड्यात बंद करून ठेवावे. हा टीएमआर काही दिवसात तयार होईल. हा जनावरांसाठी अत्यंत सकस चारा असल्याचे सांगितले जाते.

जनावरांना चारा देण्याचे प्रमाण : अननसापासून तयार केलेला हा चारा जनावरांना एका दिवसात ५ ते १० किलो खाऊ घालू शकतो. त्याचे प्रमाण वाढवण्यासाठी त्यात अधिक गवत वगैरे घालता येईल. या टीएमआरमध्ये गवत, कोरडा चारा आणि धान्य मिसळून तुम्ही तुमच्या जनावरांना खाऊ शकता.

दुधाचे प्रमाण किती वाढवता येते? : अननसात व्हिटॅमिन सी मुबलक प्रमाणात असते. याशिवाय यामध्ये व्हिटॅमिन ए, बी ६, ई आणि के देखील असते. यामध्ये कॅल्शियम, फोलेट, लोह, मॅग्नेशियम, फॉस्फरस, पोटॅशियम आणि झिंक असते. त्यात पोषक तत्वे मुबलक प्रमाणात आढळतात. अशाप्रकारे, त्याच्या पानांमध्ये देखील भरपूर पोषक असतात जे प्राण्यांच्या आरोग्यासाठी चांगले असतात. अननसाची पाने चारा म्हणून दिल्यास जनावरांचे आरोग्य चांगले राहते आणि त्याची दूध देण्याची क्षमताही वाढते. अननसाच्या पानांचा चारा दिल्यास जनावरांचे दूध उत्पादन एक ते दीड लिटरने वाढू शकते, असे सांगितले जात आहे. त्याचबरोबर दुधातील फॅटचे प्रमाणही ०.३ ते ०.५ टक्क्यांनी वाढू शकते. एकंदरीत अननसाच्या पानांपासून बनवलेला चारा हा जनावरांसाठी उत्कृष्ट चारा ठरू शकतो.

जागतिक दिवस: महापरिनिर्वाण दिन

महत्वाच्या घटना

१७६८ : एनसायक्लोपीडिया ब्रिटानिकाचा पहिला अंक प्रकाशित झाला.
१८७७ : द वॉशिंग्टन पोस्ट या वृत्तपत्राच्या प्रकाशनास सुरूवात झाली.
१८९७ : परवाना टॅक्सीकॅब सुरु करणारे लंडन हे जगातील पहिले शहर ठरले.
१९१७ : फिनलँड (रशियापासुन) स्वतंत्र झाला.
१९७१ : भारताने बांगलादेशला मान्यता दिल्यामुळे पाकिस्तानने भारताशी राजनैतिक संबंध तोडले.
१९७८ : स्पेनने सार्वमत चाचणीच्या कौलावरुन नवीन संविधान अंगीकारले.
१९८१ : डॉ. एस. झेड. कासिम यांच्या नेतृत्त्वाखाली 'पोलर सर्कल' या जहाजातून भारताची तुकडी आपल्या पहिल्या अंटार्क्टिक मोहिमेवर गोव्यातील मार्मागोवा बंदरातून रवाना झाली. ९ जानेवारी १९८२ रोजी रात्री साडेबारा वाजता अंटार्क्टिकावर पोचली. भारत हा अंटार्क्टिका मोहीम करणारा तेरावा देश बनला.
१९९२ : अयोध्येत कारसेवकांनी बाबरी मशिद पाडली. त्यामुळे उसळलेल्या दंगलीत सुमारे १,५०० लोक ठार झाले.
१९९७ : जपान च्या क्योटो मध्ये आंतरराष्ट्रीय हवामान परिषदच्या सम्मेलनाचे उद्घाटन.
१९९८ : बँकॉक मध्ये १३ वी आशियाई क्रीडा स्पर्धेला सुरुवात.
१९९८ : ह्यूगो चावेझ यांना व्हेनेझुएला चे राष्ट्रपती म्हणून निवडल्या गेले.
१९९९ : जर्मनीची लॉनटेनिसपटू स्टेफी ग्राफ हिला 'ऑलिम्पिक ऑर्डर' या प्रतिष्ठेच्या पुरस्काराने गौरविण्यात आले.
२००० : थोर समाजसेवक बाबा आमटे यांना राष्ट्रपती के. आर. नारायणन यांच्या हस्ते केन्द्र सरकारचा 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय पुरस्कार' प्रदान करण्यात आला.
२००६ : ला नासाने मार्स ग्लोबल सर्वेयर ने काढलेले फोटो सार्वजनिक केले.
२००७ : ला ऑस्ट्रेलिया च्या शाळेमध्ये शीख विध्यार्थ्यांना कृपाण आणि मुस्लीम विध्यार्थ्यांना हिजाब नेण्यास परवानगी मिळाली होती.

जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१४२१ : हेन्री (सहावा) - इंग्लंडचा राजा (मृत्यू: २१ मे १४७१)
१७३२ : वॉरन हेस्टिंग्ज - भारताचा पहिला गव्हर्नर जनरल (मृत्यू: १८१८)
१८२३ : मॅक्समुल्लर - जर्मन विचारवंत (मृत्यू: २८ आक्टोबर १९००)
१८६१ : रेव्हरंड नारायण वामन तथा ना. वा. टिळक - कवी व लेखक (मृत्यू: ९ मे १९१९)
१८५३ : हरप्रसाद शास्त्री - संस्कृत विद्वान, शिक्षणतज्ञ, इतिहासकार (मृत्यू: १७ नोव्हेंबर १९३१)
१९१६ : 'गंधर्व भूषण' जयराम शिलेदार (मृत्यू: ६ नोव्हेंबर १९९२)
१९१७ : बास्किन-रॉबिन्स चे सहसंस्थापक इरब रोबिन्स यांचा जन्म. (मृत्यू: ५ मे २००८)
१९२३ : वसंत सबनीस लेखक व पटकथाकार (मृत्यू: १५ आक्टोबर २००२)
१९३२ : कमलेश्वर - पद्मभूषण पुरस्कार विजेते हिन्दी लेखक, पटकथालेखक, दूरदर्शनचे अतिरिक्त संचालक (मृत्यू: २७ जानेवारी २००७)
१९४५ : अभितेने शेखर कपूर यांचा जन्म.
१९४८ : भरतनाट्यम नृत्यांगना सुचेता भिडे-चापेकर यांचा जन्म.
१९८५ : भारतीय क्रिकेटपटू आर. पी. सिंग यांचा जन्म.

मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१८९२ : सीमेन्स कंपनीचे संस्थापक वर्नेर व्होंन सीमेन्स यांचे निधन. (जन्म: १३ डिसेंबर १८१६)
१९५६ : डॉ. बाबासाहेब आंबेडकर - भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, अस्पृश्यांच्या मुक्तिसंग्रामाचे खंदे नेते, अस्पृश्य समजल्या जाणाऱ्या जातितील पहिले मॅट्रिक व पहिले पदवीधर, इंग्लंडमध्ये वकिलीतील बॅरिस्टरची परीक्षा दिली आणि अर्थशास्त्रात डॉक्टरेट मिळवली. (जन्म: १४ एप्रिल १८९१)
१९७१ : भारतातील भूविज्ञान अध्ययनाचा पाया घालणारे वैज्ञानिक कमलाकांत वामन केळकर यांचे निधन. (जन्म: १ जानेवारी १९०२)
१९७६ : क्रांतिसिंह नाना पाटील - स्वातंत्र्यसैनिक, समाजसुधारक, 'पत्री सरकार'चे (प्रति सरकार) संस्थापक आणि कम्युनिस्ट पक्षाचे खासदार (जन्म: ३ ऑगस्ट १९००)
१९९८ : ला परमवीर चक्र विजेता मेजर होशियार यांना वीरमरण.
२००९ : ला भारतीय अभिनेत्री बिना राय यांचे निधन.
२०१३ : नेल्सन मंडेला तथा 'मदीबा' - दक्षिण अफ्रिकेचे राष्ट्राध्यक्ष, नोबेल पारितोषिक विजेते (जन्म: १८ जुलै १९१८)
२०१५ : ला भारतीय चित्रपट अभिनेता राम मोहन याचे निधन.

महावितरणच्या अनागोंदी कारभाराविरोधात लिंबागणेश येथे रास्तारोको

कमी दाबाने व वारंवार वीजपुरवठा खंडित;रब्बी पिके धोक्यात

लिंबागणेश। प्रतिनिधी

बीड तालुक्यातील लिंबागणेश पंचक्रोशीतील गावांना विद्युत पुरवठा असणाऱ्या लिंबागणेश येथील ३३ केव्ही उपकेंद्रातील अनागोंदी कारभारामुळे विजेच्या समस्येने तिव्र रुप धारण केले असुन दिवसभरात वारंवार वीजपुरवठा खंडित होत असल्याने तसेच कमी दाबाचा वीजपुरवठा होत असल्याने मुबलक पाणी उपलब्ध असुनही वीजे अभावी शेताला पाणी देता येत नसल्याने रब्बी हंगामातील कांदा ज्वारी,गहु, हरभरा आदी पिके वाळु लागल्याने शेतकऱ्यांना हातची पिके वाया जाण्याची धास्ती असुन लिंबागणेश येथील ३३ केव्ही.उपकेंद्रातील उप अभियंता पद २ महिन्यांपासून रिक्त असुन लाईनमन वेळेवर ड्युटी करत नसल्याने तसेच मुख्यालयी रहात नसल्याने रात्री अपरात्री ग्रामस्थांना फ्युज टाकणे,केबल बदलणे आदी कामे करावी लागत असुन महावितरणच्या अनागोंदी कारभार विरोधात आज दि.५ सकाळी गुरुवार रोजी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र राज्य डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्या नेतृत्वाखाली अहमदपूर ते अहमदनगर ५४८ डी राष्ट्रीय महामार्गावरील मांजरसुंभा ते पाटोदा दरम्यान लिंबागणेश बसस्थानक येथे रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. रास्तारोको आंदोलनामुळे काही काळ वाहतूक ठप्प झाली होती. यावेळी सेवा सोसायटी चेअरमन रविंद्र निर्मळ,शिवशक्ती भिमशक्ती विचारमंच प्रदेशाध्यक्ष बाळासाहेब मोरे, मुळुकवाडीचे माजी सरपंच कृष्णा पितळे, मसेवाडीचे तुळशीराम काटकर यांची समायोजित भाषणे झाली. सावकारे एस.जी.उपकार्यकारी अभियंता महावितरण उपविभाग ग्रामीण बीड यांच्या लेखी आश्वासनानंतर आंदोलन मागे घेण्यात आले. यावेळी निवेदन स्विकारताना पोलिस उपनिरीक्षक आप्पासाहेब रोकडे , मंडळ अधिकारी अशोक डरपे,पो.हे. संतोष राऊत, बाबासाहेब डोंगरे, नवनाथ मुंढे , मधुकर तांदळे, इसाक शेख, उबाळे, कुलकर्णी उपस्थित होते. आंदोलनात सरपंच बालासाहेब जाधव, उपसरपंच बाळकृष्ण थोरात, राजाभाऊ गिरे, विक्रांत वाणी, सुरेश निर्मळ,रमेश पाटील विनायक मोरे, पांडुरंग वाणी, अँड.गणेश वाणी,कृष्णा पितळे, सय्यद बशीर, औदुंबर नाईकवाडे, बोरखेडचे आरुण काकडे, विनायक शिंदे, निळकंठ काकडे , आजिनाथ घरत, शिवाजी घरत, साहेबराव घरत, विश्वंभर गिरी,अशोक जाधव, संतोष भोसले, सहभागी होते.उप कार्यकारी अभियंता महावितरण उप विभाग बीड ग्रामीण यांनी आंदोलनातील मागण्यांच्या अनुषंगाने लिंबागणेश येथील ३३ केव्ही.उपकेंद्रातील सहायक अभियंता रिक्त पदावर पदस्थापना. नियुक्तीसाठी वरीष्ठ स्तरावर पाठपुरावा केला आहे.लिंबागणेश व पोखरी (घाट) गावच्या पाणीपुरवठा करण्यासाठी असलेल्या रोहित्रास जवळच्या ११ केव्ही वाहिनीपासुन तातडीने सर्वे करून अंदाज पत्रक मंजुरीसाठी वरीष्ठ कार्यालयास सादर करण्यात आले आहे. सद्यस्थितीत कृषी वाहिनीवर लोड वाढल्याने चक्राकार पद्धतीने विद्युत पुरवठा करण्यात येत आहे. लिंबागणेश गावातील दुरूस्ती व केबल व कट आऊट दुरुस्ती करण्याचे आदेश दिले आहेत. लिंबागणेश येथील विद्युत कर्मचारी यांचा अपघात झाल्याने सद्यस्थितीत अन्य कर्मचाऱ्यांना देखभाल व दुरुस्तीची जबाबदारी देण्यात आली असल्याचे लेखी दिल्यानंतर रास्ता रोको आंदोलन मागे घेण्यात आले.

थोडक्यात

डॉ.अविनाश गोले पाटील यांची एमडी मेडीसिनसाठी निवड

माजलगाव। प्रतिनिधी

तालुक्यातील मोठीवाडी येथील डॉ.अविनाश गोले पाटील हे प्राथमिक आरोग्य केंद्र कीट्टी आडगाव येथे वैद्यकिय अधिकारी म्हणून कार्यरत आहेत, डॉ. अविनाश गोले पाटील यांचा पदवीत्तुर अभ्यासक्रमासाठी (औषधवैद्यकशास्त्र) या विषयासाठी शासकीय वैदयकीय महाविद्यालय व रुग्णालय छ. संभाजीनगर येथे निवड झाली असुन सेवांतर्गत वैद्यकिय अधिकारी प्रावीण्य यादीत त्याचा चौथा क्रमांक आहे. त्यांच्या विशेष प्राविण्या बद्धल नागडगावचे माजी सरपंच विनायकराव कदम, रामदास गिते, गोरखनाथ सोळंके, परमेश्वर डाके, राजाभाऊ आव्हाड, चंद्रकांत खेत्री, पत्रकार ज्योतीराम पांढरपोटे, भाई ॲड.नारायण गोले पाटील यांच्या सह आदींनी सत्कार करुन त्यांचे अभिनंदन केले.

भागूजीराव ढेकळे विद्यालयात विविध स्पर्धा

गेवराई : तालुक्यातील पाडळसिंगी येथील कृषि पंडित भागूजीराव ढेकळे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात आदर्श शिक्षण संस्थेचे सचिव माजी मंत्री

जयदत्त क्षीरसागर यांच्या ७४ व्या वाढदिवसानिमित्त विविध स्पर्धेचे आयोजन केले आहे.माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांच्या वाढदिवसानिमित्त कृषि पंडित भागूजीराव ढेकळे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय पाडळसिंगी येथे दि.२ डिसेंबर ते दि.७ डिसेंबर या कालावधीत विविध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले असुन आत्तापर्यंत हस्ताक्षर स्पर्धा, निबंध स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, सामान्य ज्ञान स्पर्धा शाळेचे मुख्याध्यापक थिटे ए.एस. यांच्या मार्गदर्शनाखाली इयत्ता ५ वी ते ७ वी व ८ वी ते १० वी अशा दोन गटात स्पर्धा घेण्यात आल्या असुन दि.६ डिसेंबर रोजी कथाकथन स्पर्धा होणार आहेत. शनिवार दि.७ डिसेंबर रोजी सकाळी १० वाजता भव्य रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले असुन या शिबीरात रक्तदात्यांनी व पालकांनी रक्तदान करण्यासाठी उपस्थित रहावे असे आवाहन शाळेचे मुख्याध्यापक थिटे ए.एस., सर्व कर्मचार्यांच्या वतीने करण्यात आले आहे.

नवगण महाविद्यालयात सेमिनार

परळी: येथील नवगण शिक्षण संस्थेच्या कला वाणिज्य महाविद्यालय परळी वैजनाग येथे दिनांक ८ डिसेंबर २०७४ रोजी सकाळी ११.५० वाजता राज्यशास्त्र विभागातंर्गत मानव अधिकार आणि परराष्ट्र धोरणे या विषयवर प्रा. पुरी टि बी. यांचे व्याख्यान झाले. हा कार्यक्रम खोलेश्वर महाविद्यालय अंबाजोगाई येथील राज्यशास्त्र विभाग व नवगण महाविद्यालय परळी येथील राज्यशास्त्र विभाग याच्या संयुक्त विद्यमाने घेण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष उपप्राचार्यडॉ एल. बी. घुमरे हे होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक राज्यशास्त्र विभाग प्रमुख प्रा.डॉ. वानखेडे यु डी यानी केले. या कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन प्रा. फुलारी यानी केले. या कार्यक्रमास महाविद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी यांनी उपस्थिती दर्शविली.

कृषी पंपाला दिवसाचा विजरवठा करा अन्यथा तीव्र आंदोलन करू!-राजेभाऊ फड

परळी। प्रतिनिधी

स्वतःचा जीव धोक्यात घालत अवघ्या जगाचे पालनपोषण करणाऱ्या बळीराजाच्या भोवती अनेक संकटे घोंगावत असतात. कधी कृत्रिम अडचणी येतात तर कधी कधी नैसर्गिक धोके निर्माण होतात. परळी तालुक्यात अनेक ठिकाणी बिबट्यासह अनेक वन्य जीवांचा मुक्त वावर असल्याचे निदर्शनास आले आहे. त्यांच्यापासून हल्ले होण्याच्या शक्यता नाकारता येत नाहीत. त्यामुळे वारंवार संकटाशी खेळणाऱ्या शेतकऱ्यांना शासनाने दिवसाचा विजपुरवठा करावा जेणेकरून त्याच्यावरील अपघाताचे घोंगावणारे संकट दूर होऊ शकेल. शासनाने आणि विजवितरण कंपनीने याचा गंभीर्यपूर्वक विचार करावा अन्यथा तीव्र आंदोलन करण्यात येईल असा इशारा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे युवक नेते राजेभाऊ फड यांनी दिला आहे.

अस्मानी आणि सुलतानी संकटाचा नेहमीच शेतकऱ्यांना सामना करावा लागतो. कमी असलेला हमीभाव, कधी दुष्काळ तर काढू अतिवृष्टी अशा या ना त्या कारणाने नेहमीच संकटे घोंगावत असतात. त्यातच शासनाने आता रात्रीचा विजपुरवठा सुरु केला आहे. रात्रीच्या वेळी वन्य प्राण्यांचा वावर असतो. साप, विंचू, रानडुक्कर तसेच काही ठिकाणी बिबट्याचा मुक्त संचार असल्याच्या घटना निदर्शनास येत आहेत. त्यांच्यापासून शेकऱ्यांना धोका निर्माण झाला आहे. अशातच रात्रीच्या वेळी पिकाला पाणी देण्यासाठी शेतात गेलेल्या शेतकऱ्यांवर ते हल्ले करत असल्याच्या अनेक घटना घडल्या आहेत. त्यात अनेकांना आपला आपला जीव गमवावा लागला तर अनेकांना कायमस्वरूपी अपंगत्व आले आहे. या घटना टाळव्यात यासाठी शासनाने दिवसा विजपुरवठा करावा अन्यथा महावितरण कंपनीच्या विरोधात तीव्र आंदोलन करण्यात येईल असा इशारा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे युवक नेते राजेभाऊ फड यांनी दिला आहे.

ज्ञानदीप विद्यालयात विद्यार्थ्यांना आर्य समाजच्या वतीने मार्गदर्शन

धारूर। प्रतिनिधी

महाराष्ट्र नवनिर्माण अभियान व आर्य समाज धारूर यांच्या संयुक्त विद्यमाने ०१ डिसेंबर ते ३१ डिसेंबर या कालावधीमध्ये संपूर्ण महाराष्ट्रभर विद्यालयीन विद्यार्थ्यांना ज्ञान, संस्कार, आहार व आरोग्य याविषयी विद्यार्थ्यांसाठी व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आलेले आहे. त्यामध्ये ज्ञानदीप विद्यालयातील विद्यार्थ्यांना प्रमुख मार्गदर्शक दयानंद महाविद्यालय लातूरचे सेवानिवृत्त प्रा चंद्रेश्वरजी शास्त्री यांनी विद्यार्थ्यांना ज्ञान, संस्कार, आहार व आरोग्य याविषयी सखोल असे मार्गदर्शन करत विद्यार्थ्यांना मंत्रमुग्ध केले.महाराष्ट्र मानव निर्माण अभियान व आर्य समाज संस्थान किल्ले धारूर यांच्या संयुक्त विद्यमाने ज्ञानदीप विद्यालयातील विद्यार्थ्यांना ज्ञान, संस्कार, आहार व आरोग्य या विषयी व्याख्यानमालेचे आयोजनकरण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी अध्यक्ष म्हणूणधारूर आर्य समाजचे प्रधान प्रमोदकुमार तिवारी होते तर प्रमुख मार्गदर्शक दयानंद महाविद्यालय लातूरचे सेवानिवृत्त प्रा. चंद्रेश्वरजी शास्त्री तसेच प्रमुख अतिथी म्हणून अभिषेकजी शास्त्री, अड प्रमोदकुमार मिश्रा सोमनाथअप्पा कांबळे, कमलाकर इंदूरकर उद्धव खाडे हे मान्यवर यावेळी उपस्थित मान्यवरांचे विद्यालयाच्या व स्वागत सत्कार करून केला उपस्थित मान्यवर अड मिश्रा व खाडे यांनी भजन व गीत गायन करत विद्यार्थ्यांमध्ये आनंददायी वातावरण निर्माण केले. या वेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना प्रा. चंद्रेश्वरजी शास्त्री यानी विद्यार्थ्यानी शिस्त व नियोजनबध्द वागणे गरजेचे असुन आहार व आरोग्याची काळजी प्रत्येकाने घेतली पाहीजे. पूस्तकी ज्ञाना बरोबर समाजातील सर्व प्रकारचे ज्ञान अवगत केले पाहीजे आपले संस्कार व संस्कृती टिकवण्या साठी सतत प्रयत्न केला पाहीजे असे सांगीतले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन शिक्षक मुंजाराम निरडे तर आभार शिक्षक सचिन चव्हाण यांनी केले. यावेळी मोठ्या संख्येने विद्यार्थी व शिक्षकवृंद उपस्थित होते.

जीवन शिक्षण अस्थिव्यंग विद्यालयात दिव्यांग दिन

केज। प्रतिनिधी

केज येथील जीवन शिक्षण निवासी अस्थिव्यंग विद्यालयात ३ डिसेंबर जागतिक दिव्यांग दिन उत्साहात साजरा करण्यात आला.यावेळी दिव्यांगासाठी विशेष कार्य करणाऱ्या डॉ.हेलन केलर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

दिव्यांग दिनाचे औचित्य साधून शाळेमध्ये दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी आरोग्य तपासणी शिबिर घेण्यात आले.आरोग्य तपासणीसाठी प्रमुख पाहुणे डॉ.शिवाजी ठोंबरे तर कार्यक्रमाचे अध्यक्ष संस्थेचे सचिव मा.हारुणभाई इनामदार साहेब लाभले होते.डॉ.शिवाजी ठोंबरे यांनी दिव्यांग विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी करून, वैयक्तिक स्वच्छता कशी ठेवावी व गुड टच-बॅड टच संदर्भात मोलाचे मार्गदर्शन केले.तसेच कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. हारून इनामदार साहेब यांनी दिव्यांग विद्यार्थ्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी व समाजात सन्मान मिळवून देण्यासाठी अखंड प्रयत्न करत राहू असा विश्वास दिला.तसेच दिव्यांग दिनानिमित्त दिव्यांग विद्यार्थ्यांचे चित्रकला स्पर्धा,रांगोळी स्पर्धा व व्हील चेअर रेस, थ्रो सॉफ्ट बॉल,व्हील चेअर गोळा फेक, मनोरंजनात्मक खेळ असे उपक्रम घेण्यात आले.या कार्यक्रमासाठी मुख्याध्यापक श्री.विनायक ठोंबरे सर,विशेष शिक्षिका कल्पना थोरात मॅडम,कला शिक्षक मंगेश मोरे सर, क्रिडा शिक्षक शंकर तोंडसे सर,अधिक्षक धोंडगे सर,सर्व शिक्षकेत्तर कर्मचारी व दिव्यांग विद्यार्थी उपस्थित होते.

रोल बॉल संघाने राज्यस्तरीय स्पर्धेमध्ये पटकावले तृतीय पारितोषिक

बीड/प्रतिनिधी

चिपळूण येथे ३० नोव्हेंबर ते १ डिसेंबर २०२४ रोजी १४ वी मिनी राज्यस्तरीय अर्जिक्यपद स्पर्धा संपन्न झाली. या स्पर्धा महाराष्ट्र राज्य रोल बॉल असोसिएशन व सातारा जिल्हा रोल बॉल असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने घेण्यात आल्या. या स्पर्धेमध्ये बीड जिल्ह्यातील मुलांच्या संघाने अत्यंत उत्कृष्ट कामगिरी करत सातारा, धुळे, यवतमाळ, कोल्हापूर संघांचा पराभव करत कांस्यपदक पटकावले.

अकरा वर्षातील मुलांच्या संघामध्ये धनुश सुरवसे, आरव आंधळे, श्री चौरे, धीरज डबडे, अर्णव पवार, निकुंज तोष्णीवाल, राजवीर बांगर, अरुश जोगदंड, विराज मिटकरी, यशवंत तांबे, जयेश वाळुंजकर, विश्वजीत गिरी या खेळाडूंनी अतिशय उत्कृष्ट अशी कामगिरी करत तृतीय पारितोषिक मिळविले व पुढे होणार्या राष्ट्रीय स्पर्धेसाठी विश्वजीत गिरी या खेळाडूंची निवड झाली आहे. हे खेळाडू महाराष्ट्र राज्य संघाचे प्रतिनिधित्व करणार आहेत. या सर्व विजय खेळाडूंना प्रशिक्षक विशाल गिरी, वैभव गिरी, संघ व्यवस्थापक सुधीर हजारे यांचे मार्गदर्शन लाभले. सर्व विजय खेळाडूंचे स्वागत जिल्हा क्रीडा अधिकारी, अरविंद विद्यागर, पंडित चव्हाण, बीड जिल्हा रोलबॉल असोसिएशनचे सचिव रामदास गिरी, महाराष्ट्र राज्य पोलीस बॉईज संघटनेचे अध्यक्ष राहुल दुबाले यांनी केले आहे. व पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

कापुस लागवडीमुळे उत्पादनात लक्षणीय वाढ – डॉ.वसंत सूर्यवंशी

अंबाजोगाई । प्रतिनिधी

दीनदयाल शोध संस्थान कृषि विज्ञान केंद्र अंबाजोगाई व केंद्रीय कापूस अनुसंधान संस्थान नागपूर यांच्यावतीने मौजे कळमअंबा येथे कापूस प्रक्षेत्र दिनाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी मंचावर कळमअंबा गावाचे सरपंच शशिकांत इंगळे, कृविके अंबेजोगाईचे वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख डॉ.वसंत देशमुख, विस्तार कृषी विद्यावेत्ता वनामकृवि अंबाजोगाई डॉ.वसंत सूर्यवंशी, कृषी महाविद्यालय अंबाजोगाईचे प्राध्यापक डॉ.राजेश महाजन, कृविके शास्त्रज्ञ पिकविद्या कृष्णा कर्डिले, शास्त्रज्ञ डॉ. प्रदीप सांगळे, मंडळ कृषी अधिकारी आडस वाघमारे आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ.देशमुख यांनी केले. कृषि विज्ञान केंद्र माध्यमातून जिल्ह्यातील सहा तालुक्यातील ४८ गावातून ४६५ शेतकऱ्यांच्या प्रक्षेत्रावर राबविण्यात येणाऱ्या सघन लागवड पद्धती तंत्रज्ञान प्रात्यक्षिकाची माहिती दिली. या प्रात्यक्षिकांमुळे कापूस उत्पादकतेत सरासरी २८ ते ३० टक्के वाढ झाली असल्याचे सांगितले. यावेळी मार्गदर्शन करताना डॉ.सूर्यवंशी यांनी रब्बी पिकातील अन्नद्रव्य नियोजन, हरभरा पिकातील मर व्यवस्थापन, गुलाबी बोंडअळी नियंत्रण करण्यासाठी उपाय योजना, कामगंध व चिकट सापळे वापर आणि मातीचे आरोग्य सांभाळण्यासाठी सेंद्रिय खताचा वापर याबाबत माहिती दिली. वाघमारे यांनी बोलताना गुलाबी बोंड आळीचा प्रादुर्भाव कमी करण्यासाठी गावातील कापूस उत्पादक शेतकऱ्यांनी कापसाचे एकच वाण वापरावे. तसेच कृषि विभागाच्या ठिबक सिंचन, तुषार सिंचन, यंत्र, कांदाचाळ इत्यादी योजनांचा लाभ घेण्यासाठी महाडीबीटी या पोर्टलवर शेतकऱ्यांनी अर्ज करावा, असे आवाहन केले. डॉ.सांगळे म्हणाले की, बोंड आळीचा प्रादुर्भाव ९ महिन्यांपर्यंत राहतो तरी शेतकऱ्यांनी कापूस फरदड घेणे टाळावे त्याचबरोबर रब्बी पिकातील एकात्मिक कीड व रोग व्यवस्थापन याबद्दल मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कृष्णा कर्डिले यांनी केले तर शशिकांत इंगळे यांनी उपस्थितांचे आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी कांताराम इंगळे, बालाजी बोबडे, सुरज पोकळे, रवींद्र अंबड, प्रदीप चव्हाण, शिवाजी किर्जत आणि प्रतीक आजने यांनी विशेष प्रयत्न केले.

जमिनीची सुपीकता वाढवण्यासाठी पालापाचोळा शेतातच कुजवा-येळकर

अंबाजोगाई । प्रतिनिधी

जागतिक मृदा दिनाचे औचीत्य साधुन मृदेतील जैवविविधता रक्षणाकरिता कृषी विभाग महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त विद्यमाने तालुक्यातील धानोरा खुर्द येथे जमीन आरोग्य व्यवस्थापन प्रशिक्षण व शेतीशाळा घेऊन शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यात आले.

कृषी विभागाचे मंडळ कृषी अधिकारी विजयकुमार पवार यांनी माती परीक्षण व त्याचे महत्त्व संदर्भात विस्तृतपणे माहिती दिली. नेचर केअर कंपनीचे जिल्हा व्यवस्थापक बालाजी जाधव व प्रक्षेत्र अधिकारी विवेकानंद शितोळे यांनी केळी पिकामध्ये अन्नद्रव्य व्यवस्थापन बाबत माहिती दिली. कृषी सहायक पंडित काकडे यांनी हरभरा, तूर पिकाचे कीड रोग व्यवस्थापन बाबत माहिती दिली. कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक तथा नॅचरल शुगरचे ऊस विकास अधिकारी शिवप्रसाद रामप्रसाद येळकर यांनी जागतिक मृदा दिनाचे महत्त्व सांगून या वर्षीच्या थिमनुसार जमिनीची काळजी घेण्यासाठी मातीच्या मोजमाप, निरीक्षण आणि व्यवस्थापनाला प्राधान्य देऊन, अन्न सुरक्षा सुनिश्चित करण्यासाठी आणि पर्यावरणीय आरोग्याचे संरक्षण करण्यासाठी आवश्यक शाश्वत पद्धती अवलंबन्या संदर्भात माहिती दिली. येळकर यांनी आरोग्य पत्रिकेवर आधारित खत व्यवस्थापनाची माहिती देऊन मृदा आरोग्यामध्ये सेंद्रिय खतांचे महत्व, माती व पाणी नमुना घेतानाच्या तांत्रिक बाबी समजावून सांगून दर तीन वर्षांनी माती परीक्षण करणे आवश्यक आहे बाबत माहिती दिली, शेतातील काडीकचर्याचे सेंद्रिय खतामध्ये रूपांतर करण्याच्या पद्धती, पिकाच्या अवशेषांमध्ये सुप्त अवस्थेमधील अळी नियंत्रण करण्यासाठी जैविक परोपजीवी बुरशी मेटारायझियम ॲनिसोप्लीचा वापर करण्यासंदर्भात माहिती दिली. पूर्व हंगामी ऊस लागवड खत नियोजन, बेणे प्रक्रिया तसेच खोडवा उसाचे व्यवस्थापन व पाचट कुजवण्याबाबत माहिती दिली. शेतीमधील उत्पादन खर्च कमी करण्यासाठी व जमिनीचे आरोग्य अबाधित ठेवण्यासाठी शून्य मशागत तंत्रज्ञान फायदेशीर आहे याची माहिती देऊन शून्य मशागत तंत्रज्ञानामधील विविध टप्पे विस्तृतपणे समजावून सांगितले. नॅचरल शुगरच्या माध्यमातून माफक दरामध्ये नॅचरल ऑरगॅनिक फर्टीलायझर या भू-सुधारकाचा वापर करण्यासंदर्भात माहिती येळकर यांनी दिली. कार्यक्रमामध्ये नॅचरल शुगरच्या माध्यमातून दाजीसाहेब शितोळे, हरिश्चंद्र शितोळे या शेतकऱ्यांना प्रातिनिधिक मृदा आरोग्य तपासणी अहवाल वितरित करण्यात आले. प्रगतिशील शेतकरी पोपट शितोळे यांनी पाचट ठेवल्यामुळे झालेले फायदे बाबत त्यांचे अनुभव कथन केले. यावेळी सरपंच बालासाहेब गुणाले, कृषी विभागाचे कृषी पर्यवेक्षक माचवे, निलेवाड, राठोड, नॅचरल शुगरचे कृषी पर्यवेक्षक स्वप्निल खोसे अनिकेत पाटील व शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

केज तालुक्यातील बीएसएनएलच्या सेवेचा बोजवारा



ग्राहक वेठीस : टॉवर असूनही मोठा खोळंबा

बीड । प्रतिनिधी

भारत संचार निगम लि. ही भारत सरकारची कंपनी आहे. ''कनेक्टिंग इंडिया'' हे ब्रिद घेऊन कंपनीने बाजारात आपले स्थान पक्के केले. ग्राहकांनीही भारत सरकारचे कंपनी म्हणून अधिक पसंती दिली आणि बीएसएनएल ही प्रथम पसंतीचे दूरसंचार कंपनी बनली. भारत सरकारनेही स्वच्छ प्रमाणिक हेतू ठेवत खेड्या-पाड्या पर्यंत बीएसएनएलचे नेटवर्क पोहोचवण्याचे काम केले. परंतु आता या कंपनीला कोणाची दृष्ट लागली ही कंपनी आता नेटवर्क देण्यास असमर्थ ठरत आहे.

ज्यावेळेस मोबाईल सुरुवात झाली आणि सर्व खेड्यापाड्यापर्यंत नेटवर्कचा विषय आला. त्यावेळेस बीएसएनएल या भारत सरकारच्या कंपनीने अगदी दऱ्याखोऱ्यापर्यंत नेटवर्क पोहोचवण्याचे काम केले आणि सर्वांना कनेक्ट करण्यात सिंहाचा वाटा उचलला. परंतु आता अगदी हायवेलगत असलेले टॉवरही धुळ खात पडून आहेत. यामुळे अनेक गावातील बीएसएनएल ग्राहकांनी आपले सिम कार्ड पोर्ट करत दुसरी कंपनी निवडली आहे. त्यातच केज (जि.बीड) तालुक्यातील बीएसएनएलची नेटवर्क सुविधेचा बोजवारा उडाला आहे. अगदी टॉवर असलेल्या गावातही नेटवर्क बंद अवस्थेत असल्याचे पहावयास मिळत आहे. तालुक्यातील लाखो ग्राहकांची हेळसांड होत आहे. या ग्राहकांचे लाखो रु.चे रिचार्ज वाया जात आहेत. त्यामुळे बीएसएनएलच्या मोडखाळीस आलेल्या सेवेला येथील अधिकारी आणि कर्मचारी कारणीभूत तर नाहीत ना ? अशी शंका ग्राहकांना येत आहे. अनेक गावातील टॉवर बंद असल्यामुळे टॉवर आसून ओळंबा आणि नसून खोळंबा अशी अवस्था ◀◀ पान २ वर

बीएसएनएल मोबाईल सेवा जेव्हापासून अस्तित्वात आली तेव्हापासून अनेक लाखो ग्राहक जोडलेले आहे. परंतू अधिकार्यांच्या मनमानी आणि निष्क्रिय धोरणामुळे ग्राहकांना सेवा सुरुळीत मिळत नाही.

पत्रकार दिनकर जाधव, केज

कुंबेफळ गावात हरणाचा पाडला फडशा, ग्रामस्थांमध्ये भितीचे वातावरण

अंबाजोगाई । प्रतिनिधी

अंबाजोगाई तालुक्यात एक खळबळजनक घटना पुन्हा समोर आली आहे. मौजे कुंबेफळ गावात एका हरणाचा फडशा पाडल्याची घटना उघडकीस आली आहे. दरम्यान, मृत पावलेल्या हरणाचा फडशा बिबट्याने पाडला की, अन्य मोकाट जनावराने या बद्दल तर्कवितर्क लढविले जात आहेत. या संदर्भात वनाधिकारी विजया शिंगाटे यांच्याशी बातचीत केली असता त्यांनी 'त्या' हरणाचा फडशा मोकाट कुत्र्याने पाडला असल्याची माहिती दिली आहे.



अंबाजोगाई शहरापासून जवळ असलेल्या माकेगाव गावात काही दिवसांपूर्वी बिबट्याने बैलाचा फडशा पाडल्याची घटना घडली होती. या घटनेमुळे परिसरातील ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. या बिबट्याच्या भीतीने शेतकरी शेतात जाण्यासाठी देखील घाबरत आहेत. अशातच अंबाजोगाई शहरापासून जवळ असलेल्या कुंबेफळ गावात एका हरणाचा फडशा पाडल्याची घटना उघडकीस आली. त्यामुळे परिसरात एकच खळबळ उडाली. ◀◀ पान २ वर

अफवा पसरवू नका

अंबाजोगाई परिसरात बिबट्याचा वावर दिसून आल्यानंतर सोशल मीडियावर या घटनेच्या अनुषंगाने इतरत्र ठिकाणचे जुने बिबट्याचे व्हिडीओ शेअर केले जात असल्याचे दिसून आले आहे. त्यामुळे कोणीही अशा अफवा किंवा व्हिडीओ शेअर करून नयेत, असे आवाहन वनविभागाकडून करण्यात आले आहे.

देवेंद्र फडणवीस यांनी मुख्यमंत्रीपदाची शपथ घेताच लक्ष्मण पवारांच्या भाजप कार्यालयात जल्लोष

गेवराई । प्रतिनिधी

विधानसभा निवडणुकीत महाराष्ट्रात भाजपा महायुतीला घवघवीत यश मिळाले आहे त्यामुळे भाजपाचे विधीमंडळ गटनेते देवेंद्र फडणवीस यांच्या नावाची घोषणा करण्यात आली होती तेव्हाच महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसच होणार जवळपास निश्चित झाले होते त्या.अनुषंगाने आज दि ५ डिसेंबर रोजी महाराष्ट्राचे राज्यपाल यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांना उपमुख्यमंत्री अजित पवार व उपमुख्यमंत्री एकनाथ शिदे यांना पद व गोपनीयतीची शपथ दिली याप्रसंगी देशाचे लोकप्रिय

पंतप्रधान नरेंद्र भाई मोदी, यांच्या अनेक राज्याचे मुख्यमंत्री तसेच केंद्रीय मंत्रिमंडळाती मंत्री उपस्थित होते. महायुती सरकारच्या शपथ विधीचा लाईव्ह कार्यक्रमाचे आ.लक्ष्मण पवारांच्या संपर्क कार्यालयात आयोजन करण्यात आले होते यावेळी महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रीपदाची शपथग्रहण सुरु असतांना गेवराई भाजपा कार्यालयात ◀◀ पान २ वर

मुंबई : राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष ना.अजितदादा पवार यांनी उपमुख्यमंत्री पदाची शपथ घेतली. त्याबद्दल पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी भेट घेऊन सत्कार केला. यावेळी माजी नगरसेवक रविंद्र कदम हे उपस्थित होते.

उपळी येथील काम निकृष्ट दर्जाचे झाल्याने कंट्रोलर मार्फत चौकशी करा- एजाज शेख

वडवणी । प्रतिनिधी

वडवणी तालुक्यातील उपळी फाटा ते उपळी या रस्त्याचे काम हे निकृष्ट दर्जाचे झाले असून कंट्रोलर मार्फत कामाची चौकशी करा असे निवेदन अंतर राष्ट्रीय मानवाधिकार महासंगचे जिल्हा अध्यक्ष एजाज शेख यांनी दिले आहे.

उपळी येथील रास्ता हा सा. बां. विभाग अंतर्गत चालू असून सदरील गुत्तेदार हा बोगस करून फक्त पैसे लाटण्याचा काम करीत आहे. गावातील मुख्य चौकात झालेल्या सिमेंट रस्त्यात हा पूर्णपणे बोगस झाला असून त्यामध्ये कसल्याच प्रकारचा लोखंड न वापरता रस्ता बोगस करण्यात आलेला आहे. सदरील रस्त्याचे रुंदीकरण हे अंदाजपत्रकानुसार न करता बोगस करण्यात आलेले आहे. याच गुत्तेदाराने मुख्य दळणवळण असलेला पुलाचा जवडचा रास्ता हा २००१ सालीचा जुना असून त्याला न उकरता त्यावरच अंदाजे ६ इंचीचा थर देऊन बोगस केलेला आहे. या पुलावर कसल्याच प्रकारचा सौरक्षण नाही आणि य गुत्तेदाराने बोगस काम करण्याच्या उद्देशाने अर्ध्या रात्री जाण्या येण्यासाठी कोणतीही पर्यायी व्यवस्था न करता अंधारात काम केलं व पर्यायी मार्ग नसल्याने तेथून अवजड वाहन जाऊन रोडवर भेगा पडले असून अपघात होण्याची दाट शक्यता आहे. हा रस्ता मुख्य पुलाच्या बाजूने असून व पुलाला कसलाच सौरक्षण ◀◀ पान २ वर

डॉ.बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिनानिमित्त ६० जणांनी केले रक्तदान

भीम आर्मी चा सामाजिक उपक्रमात सहभाग

दिंद्रुड । प्रतिनिधी

माजलगाव तालुक्यातील दिंद्रुड येथील बुद्धविहार ठिकाणी डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिनानिमित्त भीम आर्मी च्या वतीने काल दि.०५ डिसेंबर गुरुवारी रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरात एकूण ६० जणांनी रक्तदान केले.

तथागत गौतम बुद्ध, छत्रपती शिवाजी महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा फुले, छत्रपती शाहू महाराज आदी महापुरुषांच्या प्रतिमा पूजनाने कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली. दिंद्रुड पोलीस ठाण्याचे सपोनि अण्णाराव खोडेवाड यांच्या हस्ते शिबिराचे उद्घाटन झाले. यावेळी भीम आर्मी जिल्हाध्यक्ष सिद्धार्थ मांयदळे, माजी चेअरमन राम उबाळे, ग्रा.पं. सदस्य अतुल चव्हाण, गौतम ठोंबरे, राजाभाऊ कटारे, अजिम शेख, बाबा देशमाने, रंगनाथ सोळंके आदि जण ◀◀ पान २ वर

ज्ञान, संस्कार, आहार व आरोग्यावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

किल्लेधारूर । प्रतिनिधी

महाराष्ट्र नवनिर्माण अभियान व आर्य समाज धारूर यांच्या संयुक्त विद्यमाने ०१ डिसेंबर ते ३१ डिसेंबर या कालावधीमध्ये संपूर्ण महाराष्ट्रभर विद्यालयीन विद्यार्थ्यांना ज्ञान, संस्कार, आहार व आरोग्य याविषयी विद्यार्थ्यांसाठी व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आलेले

आहे. त्यामध्ये ज्ञानदीप विद्यालयातील विद्यार्थ्यांना प्रमुख मार्गदर्शक दयानंद महाविद्यालय लातूरचे सेवानिवृत्त प्रा चंद्रेश्वरजी शास्त्री यांनी विद्यार्थ्यांना ज्ञान, संस्कार, आहार व आरोग्य याविषयी सखोल असे मार्गदर्शन करत विद्यार्थ्यांना मंत्रमुग्ध केले.

महाराष्ट्र मानव निर्माण अभियान व आर्य समाज संस्थान किल्ले धारूर यांच्या संयुक्त विद्यमाने ज्ञानदीप विद्यालयातील विद्यार्थ्यांना ज्ञान, संस्कार, आहार व आरोग्य या विषयी व्याख्यानमालेचे आयोजनकरण्यात ◀◀ पान २ वर

हळद पिकावर करप्या रोगाचा प्रादुर्भाव

कौसडी परीसरातील शेतकरी चिंताग्रस्त

कौसडी । प्रतिनिधी

जिंतूर तालुक्यातील कौसडी परीसरात हळद पिकावर करप्या रोगाचा प्रादुर्भाव झाल्याने शेतकरी वर्ग चिंताग्रस्त झाला आहे. दरवर्षी प्रमानेच याहि वर्षी शेतक-यांनी मोठ्या उत्साहात हळद या पिकाची लावगन गेली. महागडे किमतीचे बियाणे, उच्च प्रतीचे रासायनिक खते, गुनकारी किटकनाशके या सह मजुरी खर्चाची तमा न करता भरघोष उत्पादन हळद पिकाचे घेण्याचा संकल्प हाती घेतला होता परंतु शेतकरी वर्गाचे दुर्दैवी नशीब त्याचा पाठलाग सोडताना दिसत नाही.हळद पिक लागवडी पासूनच या पिकाला विविध

रोगाची लागन होत राहिली तेव्हा पासुन शेतकरी वर्ग शेती पिकावर विविध प्रकारचे किटकनाशके ◀◀ पान २ वर

माजलगाव: नागडगावचे माजी सरपंच तथा अधिराज कन्स्ट्रक्शनचे प्रोपरायटर विनायकराव कदम यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांचा सत्कार करुन शुभेच्छा देताना रामदास गिते,गोरखनाथ सोळंके,परमेश्वर डाके,राजाभाऊ आव्हाड,भाई ॲड.नारायण गोले पाटीलपत्रकार ज्योतीराम पांढरपोटे यांच्यासह आदी.

बीड बस स्थानक परिसरातील अतिक्रमण हटवली

जिल्हा वाहतूक शाखेची शहरात कारवाई

बीड । प्रतिनिधी

बीड शहरातील बस स्थानक परिसर, साठे चौक ,शाहूनगर ,संतोषी माता टॉकीज परीसर,डीपी रोडवरील सर्व अतिक्रमणे हटवण्यात आली. ही कारवाई मंगळवार दिनांक ३ डिसेंबर रोजी नगरपालिका आणि जिल्हा वाहतूक शाखेच्या वतीने करण्यात आली.

पोलीस अधीक्षक अविनाश बारगळ ,अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर , यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा वाहतूक शाखेचे स.पो.नि. सुभाष सानप फौजदार विजय जाधवर आणि त्यांच्या टीमने बीड शहरातील बस स्थानक परिसर, बस स्टॅन्ड परिसर, साठे चौक, संतोषी माता टॉकीज, शाहूनगर डीपी रोड, राजीव

गांधी चौक आदी परिसरातील रोडवरील अतिक्रमणे हटवली. या मोहीमेत वाहतूक शाखेचे प्रभारी सुभाष सानप, फौजदार विजय जाधवर, वासुदेव मिसाळ पोलीस जमादार पांडुरंग दराडे, सचिन क्षीरसागर, राजाभाऊ तांदळे ,पोलीस अंमलदार अनिकेत घुले, वसीम शेख नगरपालिका अतिक्रमण पथकाचे प्रमुख मुन्ना गायकवाड. त्यांचे सहकारी राम रोकडे, सुजित जाधव, जावेद खान, पवन लाहोट इत्यादींनी सहभाग नोंदवला.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

पुण्यातून मंत्रिपदाची संधी कोणाला?

जिल्ह्यातून वेगवेगळे अंदाज बांधायला सुरूवात

पुणे । प्रतिनिधी

भाजप-शिवसेना-राष्ट्रवादी काँग्रेस महायुती सरकारचा मंत्रिमंडळ शपथविधी सोहळा गुरुवारी होत आहे. यामध्ये पुणे जिल्ह्यातून मंत्रिपदाची माळ कोणाच्या गळ्यात पडणार, याकडे लक्ष लागले आहे. अजित पवार हे पुन्हा उपमुख्यमंत्रिपदाची शपथ घेणार आहेत. तसेच भाजपकडून कोथरूडचे आमदार चंद्रकांत पाटील, राष्ट्रवादी काँग्रेसकडून दिलीप वळसे पाटील हे मंत्रिपदाची शपथ घेण्याची दाट शक्यता वर्तविण्यात येत आहे.

यासह भाजपचे दौंडचे आमदार राहुल कुल, पर्वतीच्या आमदार माधुरी मिसाळ, इंदापूरचे राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार दत्तात्रय भरणे, भोसरी येथील आमदार महेश लांडगे हे मंत्रिपदाच्या शर्यतीत आहेत. विधानसभा निवडणुकीत जिल्ह्यात २१ पैकी १८ जागांवर महायुतीला यश मिळाले आहे. तर, जुन्नरचे आमदार शरद सोनवणे यांनी शिवसेनेला पाठिंबा दिला आहे. त्यामुळे जिल्ह्यात महायुतीचे १९ आमदार झाले आहेत. या यशामुळे जिल्ह्यात पाच ते सहा मंत्रिपदे मिळू शकतात, अशी चर्चा आहे. त्यामुळे अनेक इच्छुकांच्या आशा पल्लवित झाल्या आहेत. जिल्ह्यातून माधुरी मिसाळ या चौथ्यांदा आमदार म्हणून निवडून आल्या आहेत. त्यामुळे त्या मंत्रिपदाच्या प्रबळ दावेदार मानल्या जात आहेत. याचसह आमदार भीमराव तापकीर यांनीही मंत्रिपदासाठी फिल्डिंग लावली आहे. तर, दौंडचे आमदार राहुल कुल यांना प्रचाराच्या वेळीच वरिष्ठांनी मंत्रिपदाचा शब्द दिला असल्याचे त्यांचे कार्यकर्ते सांगतात. त्यामुळे कुल यांचा मंत्रिमंडळात समावेश होऊ शकतो. याचसह पुणे कॅन्टोन्मेंटचे आमदार सुनील कांबळे, राष्ट्रवादी काँग्रेसचे शहरातील एकमेव आमदार चेतन तुपे यांनाही मंत्रिपदाची संधी मिळू शकते, अशी चर्चा आहे.

महाराष्ट्रात प्रथमच श्रीसीता-रामचंद्र विवाह सोहळा

पुणे । प्रतिनिधी

श्री रामजी संस्थान तुळशीबाग यांच्या वतीने महाराष्ट्रात प्रथमच प्रभू श्रीराम आणि श्री सीतामाई यांच्या विवाह सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. हा विवाह सोहळा मार्गशीर्ष शुद्ध पंचमी म्हणजेच दि. ६ डिसेंबर रोजी सकाळी ११ वाजून ४८ मिनिटांनी श्रीराम मंदिर तुळशीबाग येथे होणार आहे, अशी माहिती संस्थानचे कार्यकारी विश्वस्त भरत तुळशीबागवाले यांनी दिली. भक्त कल्याणार्थ हा विवाह सोहळा करण्यात होणार आहे. श्री सीता रामचंद्र विवाह सोहळा हा हिंदू धर्मातील अत्यंत पवित्र आणि आनंददायी उत्सव आहे. हा सोहळा भगवान श्रीराम आणि माता सीता यांच्या विवाहाची आठवण म्हणून साजरा केला जातो. हा दिवस धर्म, नीती, आणि कर्तव्याचे प्रतीक आहे. भगवान राम आणि माता सीता यांचा विवाह वैदिक परंपरेनुसार झाला होता, जो भारतीय विवाहसंस्थेचा आदर्श मानला जातो. श्रीराम हे धर्माचे प्रतीक असून माता सीता या श्रद्धा आणि भक्तीचे प्रतीक आहेत, त्यामुळे त्यांचा विवाह भक्तांसाठी आदर्श सहजीवनाचा संदेश देतो, असे तुळशीबागवाले म्हणाले.

पाच लाखांचा ऐवज असणारी पर्स चोरणाऱ्या दोघांना अटक

दौंड । प्रतिनिधी

दौंड - लातूर - मुंबई एक्सप्रेस मधील महिला प्रवासीची ५ लाख १२ हजार रूपयांचा ऐवज असणारी पर्स चोरणाऱ्या दोन तरूणांना पुणे लोहमार्ग पोलिसांनी अटक केली आहे. चोरी झाल्यापासून चोवीस तासांच्या आत तपास करीत सर्व मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

दौंड लोहमार्ग पोलिस ठाण्याचे अंमलदार नवनाथ पवार यांनी या बाबत माहिती दिली. लातूर - मुंबई एक्सप्रेस दौंड रेल्वे स्थानकात ४ डिसेंबर रोजी मध्यरात्री अडीच वाजता दाखल झाली असता ही चोरी झाली होती. एक्सप्रेस मधील ए - २ या वातानुकुलित डब्यात प्रवास करणाऱ्या सीमा जितेंद्र बजाज (रा. लातूर) या झोपलेल्या असताना दोन जणांनी डब्यात प्रवास करून त्यांची पर्स लांबविली होती. पर्स मध्ये दागिने, रोकड,

मोबाइल संच, असा एकूण ५ लाख १२ हजार रूपयांचा ऐवज होता. या प्रकरणी सीमा बजाज यांच्या फिर्यादीनुसार पुणे लोहमार्ग पोलिसांनी तपास सुरू केला. पुणे लोहमार्ग पोलिस दलाच्या स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेने रेल्वेगाड्यांमध्ये चोरी करणाऱ्या सराईत गुन्हेगारांचा मागोवा घेण्याबरोबर तांत्रिक विश्लेषण करीत विकी अजित रणसिंग (वय-२९, रा. जनता कॉलनी, दौंड) व तुषार मिलिंद जाधव (वय २५ , रा. यादव वस्ती, दौंड) या दोन जणांना ताब्यात घेतले. बुधवारी (ता. ४) दौंड शहरातील डिफेन्स कॉलनी परिसरातून या दोघांना पाठलाग करीत ताब्यात घेण्यात आले. त्यांच्याकडे चौकशी करीत चोरीतील सर्व मुद्देमाल जप्त करण्यात आला. दौंड लोहमार्ग पोलिस ठाण्यात सीमा बजाज यांच्या फिर्यादीनुसार विकी रणसिंग व तुषार जाधव या संशयित आरोपींच्या विरोधात भारतीय न्याय संहिता कलम ३०४ - २ (चोरी) आणि कलम ३ - ५ (समान उद्देश्य साध्य करण्याकरिता दोन किंवा अधिक लोकांनी केलेली गुन्हेगारी कृती) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुणे लोहमार्ग पोलिस दलाचे अधीक्षक तुषार दोशी, पोलिस निरीक्षक इरफान शेख, राजेंद्र गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली हवालदार आनंद वाघमारे, धनंजय वीर, रूपेश पवार व नरेंद्र पवार यांनी या कारवाईत भाग घेतला. संशयित आरोपी विकी रणसिंग याच्यावर यापूर्वी देखील विविध गुन्हे दाखल आहेत.

एकमेकांवर टीका करणारे आजी-माजी आमदार आले एकत्र

पुणे । प्रतिनिधी

विधानसभा निवडणुकीत एकमेकावर केलेली टीका, गंभीर स्वरूपाचे आरोप बाजूला ठेवून नववर्वाचित आमदार शरद सोनवणे यांनी राष्ट्रवादी काँग्रेसचे माजी आमदार अतुल बेनके यांची बुधवारी (दि.४) नारायणगाव येथे येऊन त्यांच्या निवासस्थानी भेट घेतली. आमदार सोनवणे यांचा शाल व पुष्पगुच्छ देऊन माजी आमदार बेनके यांनी सत्कार केला.

तालुक्याच्या विकासासाठी सहकार्य करण्याची भूमिका या वेळी माजी आमदार बेनके यांनी मांडली. नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत आमदार सोनवणे यांनी माजी आमदार बेनके यांच्यावर गंभीर

स्वरूपाचे आरोप केले होते. आमदार सोनवणे यांनी केलेल्या आरोपाचे माजी आमदार बेनके यांनी पुराव्यासह खंडन केले होते. तर सोनवणे यांनीही याबाबत बेनके यांनी केलेला खुलासा खोटा असून त्यांच्यावर २०० कोटींचा दावा ठोकणार असे सांगितले होते. निवडणूक काळात सोशल मीडियावर एक कथित अश्लील व्हिडीओ व्हायरल झाला होता. या प्रकरणी जिल्हा दूध संघाचे उपाध्यक्ष भाऊ देवाडे यांच्यावर जुन्नर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. यामुळे आमदार सोनवणे व माजी आमदार बेनके यांच्यातील संघर्ष विकोपाला गेला होता. या पार्श्वभूमीवर आमदार शरद सोनवणे त्या वेळी म्हणाले होते की, भविष्यकाळामध्ये मी कधीच अतुल बेनके यांच्यासोबत असणार नाही. आता मात्र निवडणुकीत केलेले आरोप-प्रत्यारोप बाजूला ठेवून तालुक्याच्या विकासासाठी व प्रलंबित प्रकल्प मार्गी लावण्यासाठी आपण पुढील काळात एकत्र येऊन काम करू, असे सांगत सोनवणे यांनी बेनके यांची भेट घेतली. तालुक्याला पुढे घेऊन जाण्यासाठी आपण हातात हात घालून पुढे जाऊ अशी भूमिका या वेळी सोनवणे यांनी घेतली.

आगामी निवडणुका एकत्रित लढवणार का?

आमदार सोनवणे व माजी आमदार बेनके यांच्या भेटीने तालुक्यात अनेक तर्कवितर्क लढवले जात असून, आगामी जिल्हा परिषद, पंचायत समिती, जुन्नर नगरपरिषद व विघ्नहर सहकारी साखर कारखाना निवडणूक हे दोघे एकत्र येऊन तर लढणार नाहीत ना ? याबाबतची देखील चर्चा होऊ लागली आहे. याबाबत आमदार शरद सोनवणे यांना पत्रकारांनी विचारले असता, महायुतीचे नेते काय सांगतील त्यानुसार धोरण अवलंबले जाईल, एवढे सांगून या विषयी अधिक बोलण्याचे टाळले.

मोफत मोतीबिंदू चेकअप व शस्त्रक्रिया शिबिर

तळेगाव । प्रतिनिधी

रोटरी क्लब ऑफ तळेगाव दाभाडे सिटी व मायमर मेडिकल कॉलेज यांच्या संयुक्त विद्यमाने तळेगाव दाभाडे येथील प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये मोफत मोतीबिंदू चेकअप व शस्त्रक्रिया शिबिर पार पडणार आहे. यासह इतर रोगनिदान चाचण्या होणार आहेत. दिनांक ८ डिसेंबर रोजी सकाळी १० ते २ वेळात शिबिर होणार आहे. यावेळी डॉ. सुचित्रा नांगरे, डॉ. महेश दर्पणगिरी, अध्यक्ष किरण ओसवाल, दीपक फल्ले, विनोद राठोड, सौरभ मेहता, रेखा भेगडे, अजित वाळुंज, सुबोध मालपाणी आदी उपस्थित राहणार आहेत. यानिमित्ताने कर्तव्यदक्ष नागरिक हा पुरस्कार सुरेश शिंदे यांना देण्यात येणार आहे. तसेच रोटरी कम्युनिटी कॉर्प्स (आरसीसी) आशा वर्कर्स तळेगाव दाभाडे सिटीचा शुभारंभ होणार आहे. क्लबच्या अध्यक्षपदी अनिता सुनील भेगडे यांची निवड करण्यात आली आहे. उपाध्यक्षपदी मंदाकिनी साळवे, सचिव पदी वैशाली मेठाळ, एडमिन डायरेक्टर शालिनी रणभारे, सल्लागारपदी संतोष परदेशी यांची निवड करण्यात आली आहे. जास्तीत जास्त नागरिकांनी शिबिराचा लाभ घ्यावा असे आवाहन अध्यक्ष किरण ओसवाल व सहकाऱ्यांनी केले आहे.

ती चूक दोघांच्या जीवावर बेतली

पुण्याच्या पवना धरणातील घटना कॅमेऱ्यात कैद ; दोन मित्रांचा मृत्यू

पुणे । प्रतिनिधी

राज्यातील शिक्षणाची पंढरी समजले जाणारे पुणे शहर आता आयटी हब आणि उद्योग व सेवा क्षेत्राची देखील पंढरी होत आहे. त्यामुळे, नोकरी-व्यवसायाच्या निमित्ताने राज्याच्या कानाकोपऱ्यातून तरुणाई इथं येते. त्यामुळे, येथील आकर्षण असलेल्या निसर्गरम्य ठिकाणांना भेटी देऊन पर्यटनाचा आनंदही घेतला जातो. मात्र, भुसावळमधून नोकरीसाठी पुण्यात आलेल्या २ तरुणांना येथील पर्यटनाचा मोह जीवावर बेतला आहे. पवना धरणात दोन तरुण बुडाल्याची घटना बुधवारी दुपारी बाराच्या सुमारास घडली. मयूर भारसाके आणि तुषार अहिरे ह्या दोघांचा या दुर्घटनेत मृत्यू झाला आहे. या घडलेल्या घटनेच्या परिसरातील सीसीटीव्ही फुटेज समोर आले असून दोन मित्रांची चूकच त्यांच्या जीवावर बेतली.

मयूर आणि तुषार हे दोघे आप्या काही मित्रांच्या सोबतीने पवनाधरण परिसरात फिरायला गेले होते. यावेळी पवना धरणाच्या पाण्यात मित्र पोहोण्यास उतरले. या दोन मित्रांना त्यांची एक चूक जीवावर बेतली. कोणाला न सांगता बोटी पाण्यात घेऊन उतरण्याची चूक त्यांनी केली. बोट अचानक पलटली अन् यात एक जण बुडू लागला, मग दुसऱ्या बोटीतून वाचवण्यासाठी मित्र त्याच्याजवळ पोहचला. मात्र, यात दोघेही बुडाले. ही घटना तिसऱ्या मित्राच्या मोबाईल कॅमेऱ्यात कैद झाली आहे. आपले मित्र बोटी घेऊन पाण्यात उतरले होते, ते बुडत असताना त्यांच्या इतर इतर मित्रांना हे दोघे नाटक करत असल्याचे वाटले. पण, खरेच हे दोघे बुडाले आहेत, हे जेव्हा मित्रांना समजले तेंव्हा खूप उशीर झाला होता. वन्यजीव रक्षक पथक आणि शिवदुर्ग रेस्क्यू टीमने दोघांचे मृतदेह बाहेर काढले. रवींद्र भारसाके आणि तुषार आहिरे अशी या पर्यटक मित्रांची नावे असून ते भुसावळ येथील रहिवासी आहेत. सध्या कामानिमित्त ते बालेवाडी क्रीडांगण परिसरात रहात होते. या घटनेने पुन्हा एकदा धरण परिसरातील पर्यटनाचा आणि तेथील सुरक्षेचा मुद्दा ऐरणीवर आला आहे. यापूर्वी पुण्यातील भूशी डॅम परिसरातही अशीच पर्यटक बुडाल्याची घटना घडली होती. एकाच कुटुंबातील ४ जणांचा पाण्याच्या प्रवाहात वाहत गेल्याने मृत्यू झाला होता. या घटनेचा व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर प्रशासनाने भूशी डॅमवरील पर्यटनास बंदी घातली होती. आता, पवना डॅमवरील या घटनेने पुन्हा एकदा हीच चर्चा होत आहे.

पौड येथे आठवीतील मुलीचा विनयभंग; एकावर गुन्हा दाखल

मुळशी। प्रतिनिधी

पौड येथे आठवीतील मुलीचा विनयभंग केल्याप्रकरणी रोहन निकम (रा. पौड, ता. मुळशी) याच्यावर पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पीडित मुलगी आठवीत शिक्षण घेत असून, पौड येथे राहते. रोहन हा तिच्या घरापासून शाळेपर्यंत ये-जा करताना मोटारसायकलवरून पाठलाग करून, तिच्याकडे बघत असतो. त्याने दसऱ्याच्या दिवशी लहान मुलाकडे आपट्याची पाने पाठविली होती, तसेच ती राहत असलेल्या ठिकाणी घरी येऊन बूट देत तिच्या बरोबर मैत्री करण्याचा प्रयत्न केला होता. या गुन्ह्याचा तपास पोलीस निरीक्षक संतोष गिरीगोसावी यांच्या मार्गदर्शनाखाली पौड पोलीस पुढील तपास करत आहेत. पौड येथे श्रीछत्रपती शिवाजी विद्यालय ही शाळा आहे. शाळा गावाबाहेर एक किलोमीटर अंतरावर आहे. शाळेत जाताना किंवा येताना गाव किंवा पौड बसस्थानकाकडे जाणार्या रस्त्यावरून अनेक रोडरोमिओ दुचाकीवर मुलींना त्रास देत फिरत असतात. अनेक मुली किंवा त्यांचे पालक तक्रार द्यायला पुढे येत नाही. अशा सडकछाप रोडरोमिओंचा बंदोबस्त पोलिसांनी करावा, अशी मागणी अनेक विद्यार्थिनी करत आहेत.

डॉ. संतोष काशिद यांना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे सुवर्णपदक

पुणे । प्रतिनिधी

संघवी केशरी महाविद्यालयाच्या मराठी विभागातील प्राध्यापक डॉ. संतोष काशिद यांना सावित्रीबाई फुले विद्यापीठाचे सुवर्णपदक प्राप्त झाले आहे.

दि. ०५ डिसेंबर २०२४ रोजी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा १२५ वा पदवीग्रहण समारंभ संपन्न झाला. यामध्ये डॉ. संतोष काशिद यांना पदवीग्रहण समारंभाचे प्रमुख अतिथी - मा. डॉ. विजयकुमार सारस्वत (सदस्य नीति आयोग आणि माजी कुलपती, जवाहरलाल

नेहरू विद्यापीठ नवी दिल्ली), आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांच्या हस्ते मराठी विषयातील विद्यावाचस्पती पदवी साठी श्रीकृष्ण केशव क्षीरसागर सुवर्णपदकाने गौरवण्यात आले. गंगाधर गाडगीळ यांचे १९८५ नंतरचे साहित्य हा डॉ. संतोष काशिद यांच्या संशोधनाचा विषय होता. याप्रसंगी श्री जैन विद्या प्रसारक मंडळाचे कार्यकारी अधिकारी श्रीमान खंडू खिलारी, संघवी केशरी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सतीश पवार व महाविद्यालयाचे वरिष्ठ प्राध्यापक प्रवीण जावीर उपस्थित होते. जैन विद्या प्रसारक मंडळाचे कार्यकारी अध्यक्ष श्रीमान शांतीलालजी लुंकड, संस्थेचे सेक्रेटरी श्रीमान राजेंद्रकुमारजी मुथा, संस्थेचे कोषाध्यक्ष श्रीमान प्रकाशचंदजी चोपडा यांनी संस्थेच्यावतीने शुभेच्छा दिल्या. तर महाविद्यालयातील प्राध्यापक आणि प्राध्यापकेतर सहकारी यांनी त्यांचे अभिनंदन केले.